# प्रकरण चार

## कृषी विभाग

**4.394 बचत गटांना / ग्रामसंघाना अनुदानाने औजारे बँकाना (Tool Bank) हरीत यंत्रे देणे या योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती भिवंडी, जिल्हा ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती स्तरावर बचत गटांना / ग्रामसंघाना अनुदानाने अवजारे बँकाना (Tool Bank) हरीत यंत्रे देणे ही योजना राबविण्यात आली. एकूण 9 बचतगट / ग्रामसंघाची निवड करुन प्रत्येक संघास 90 टक्के अनुदान रुपये 6,75,220/- व लाभार्थी हिस्सा रुपये 75,024/- असे मिळून रुपये 7,50,244/- अशा स्वरुपात योजना राबविण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय आदेशातील नमुद केल्याप्रमाणे बचतगट / ग्रामसंघाची निवड पंचायत समिती स्तरावर करावी, असे नमुद असून एकूण किती बचतगट / ग्रामसंघाचे प्रस्ताव पंचायत समितीस प्राप्त झाले व त्यामधून निवड कोणत्या निकषाव्दारे केली हे दिसून आले नाही.

2) जिल्हा परिषदेकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर प्रथम निवड केलेल्या 9 बचतगट / ग्रामसंघानी 10 टक्के लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक आहे. तरी लाभार्थी हिस्सा भरणा केल्याची चलने लेखापरीक्षणास दिसून आले नाही. तसेच बचतगटांना वाटप केलेले अनुदान प्रत्यक्ष कोणत्या खात्यामध्ये जमा केले त्यांचे बँक स्टेटमेंट दिसून आले नाही.

3) वेठेगाव, खारीवली, वाफे, वांद्रे, दुधनी व भादाणे ग्रामसंघांचे कृषी अधिकारी यांचे तपासणी अहवाल नस्तीत आढळून आले नाहीत.

4) वाफे, वांद्रे, दुधनी व भादाणे ग्रामसंघाने साहित्य खरेदी केल्याचे डिलीव्हरी चलन नस्तीत नसल्याने प्रत्यक्ष साहित्य खरेदी केले का, याबाबत खात्री पटत नाही.. तसेच उर्वरित ग्रामसंघाच्या पुरवठादारांच्या डिलीव्हरी चलनांवर साहित्य केव्हा पोहोच केले, याची दिनांकीत नोंद नाही.

5) साहित्य हे प्रत्यक्षात पंचायत समिती स्तरावर ताब्यात घेऊन साठा नोंदवहीमध्ये नोंद घेऊन नंतर बचतगट / ग्रामसंघ यांना वाटप करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली दिसून येत नसून साठा नोंदवही दर्शविली नाही.

**4.395 50 टक्के अनुदानावरील साहित्य वाटपाबाबत (कृषी विभाग).**

**पंचायत समिती मोखाडा, जिल्हा पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** पंचायत समिती, मोखाडा, कृषी विभागाकडील सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे साठा नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता लेखापरीक्षण कालावधीपर्यंत साहित्याचा साठा पडून आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक क्रमांक डीपीआर/1088/सीआर/716/30, दिनांक 26/10/1999 व शासन निर्णय क्रमांक पं.स./1096 प्र.क्र.179/67, दिनांक 07/10/1997 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले, त्याच वित्तीय वर्षात त्याचे वाटप होणे आवश्यक आहे. तशा प्रकारे कार्यवाही न करता साहित्य वाटप न करता लेखापरीक्षणापर्यंत पडून आहे. योग्य तो खुलासा होणे आवश्यक आहे. सदरील साहित्य लाभार्थींना वाटप करून अनुपालन दाखवावे.

2) साहित्याची लाभार्थी हिश्याची रक्कम संबंधीत लाभार्थीकडून वसूल करून जिल्हा परिषदेस भरणा केल्याची चलने उपलब्ध करून लेखापरीक्षणात अनुपालन दाखवावे.

**4.396 कृषी विभागांतर्गत अपंग लाभार्थी वाटप योजना राबविणेबाबत**

**पंचायत समिती जव्हार, जिल्हा पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती, जव्हारचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करतांना कृषी विभागांतर्गत अपंग लाभार्थी वाटप योजना

राबविण्यात आली असून त्यावर रक्कम रूपये 1,62,666/- एवढा खर्च नोंदविण्यात आला आहे. सदरील योजने अंतर्गत लाभार्थींना (5 HP डीझेल इंजिन, नॅपसॅक स्प्रेअर, 10-नग HDPE पाईप) असा एक सेट एकूण 6 लाभार्थींना लाभ देण्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभ दिलेल्या लाभार्थींचे निवडीचे निकष लेखापरीक्षणास पहावयास मिळाले नाही.

2) निवड झालेल्या लाभार्थींचे प्रस्ताव / मागणी व शिफारस पहावयास उपलब्ध झालेले नाही.

3) लाभ दिलेल्या लाभार्थींकडील पोहोच उपलब्ध झाल्या नाहीत.

4) लाभ दिलेल्या लाभार्थ्यांबाबत वाटप साहित्याची लाभ नोंदवही मास्टर रजिस्टर उपलब्ध झाले नाही.

5) सदरील योजनेत 6 लाभार्थी यांना वाटप केले असून याबाबत मागणी, वाटप आदेश पहावयास आले नाही.

**4.397 बायोगॅस विकास कार्यक्रम पूरक अनुदान योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती पालघर, जिल्हा पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती, पालघर, सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणावेळी कृषी विभागाकडील बायोगॅस बांधणेकरीता लाभार्थ्यांना अदा केलेल्या पूरक अनुदानाची तपासणी केली असता त्या योजनेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी विभागाने एकूण 17 लाभार्थ्यांना जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून प्रत्येकी रूपये 6,000/- व शासन अनुदानातून प्रत्येकी रूपये 10,200/- प्रमाणे लाभार्थ्यांना एकूण रूपये 16,200/- अशी रक्कम रुपये 2,75,400/- बायोगॅस बांधणेकरीता अनुदान अदा केले आहे. याबाबत लाभार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्ताव लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे बायोगॅस अनुदान अदा केलेले लाभार्थी पात्र असलेबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.

2) उपरोक्त लाभार्थ्यांचे बायोगॅस परिपूर्ण असलेबाबतचे पूर्णत्वाचे दाखले, मुल्यांकन दाखले, उपयोगिता प्रमाणपत्रे व लाभार्थ्यासह बायोगॅस सयंत्रासह फोटो लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे रक्कम रुपये 1,02,000/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जीएस/2010/प्र.क्र.78/ योजना/6, दिनांक 10/03/2010 नुसार बायोगॅस सयंत्र लाभार्थीची सविस्तर माहिती डेटाबेस संगणकावर तयार करुन वेबसाईटवर अपलोड करणे आवश्यक असताना अशी माहिती वेबसाईटवर अपलोड करण्यात आली नाही. याबाबत खुलासा करावा.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक बिजीएस/2014/प्र.क्र.129/पंरा-6, दिनांक 07/02/2015 नुसार बायोगॅस सयंत्र पूर्णपणे कार्यान्वित झाल्याखेरीज व पूर्णत्वाचा दाखला गट विकास अधिकारी / कृषी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने असल्याशिवाय अनुदान वितरीत करु नये, असे असताना अनुदान कोणत्या आधारे वितरीत करण्यात आले, याबाबत पूर्तता सादर करावी.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक बिजीएस./2010/ प्र.क्र.78/ योजना, दिनांक 06/03/2010 मधील नियम 16 नुसार उभारलेल्या सयंत्राची तालुकास्तरावर 100 टक्के तपासणी गट विकास अधिकारी व जिल्हा स्तरावर 10 टक्के तपासणी कृषी विकास अधिकारी / माहिती अधिकारी यांनी करावी. तसा अहवाल शासनास करावा. तसा तपासणी अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आला नाही. याबाबत खुलासा करावा

**4.398 राष्ट्रीय बायोगॅस संयंत्र बांधकाम व शौचालय जोडणी योजनेबाबत.**

**पंचायत समिती डहाणु, जिल्हा पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती, डहाणू यांचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणावेळी कृषी विभागाने राबविलेल्या राष्ट्रीय बायोगॅस संयंत्र बांधकाम व शौचालय जोडणी योजनेतील अनियमितताबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी विभागाने राष्ट्रीय बायोगॅस संयंत्र बांधकाम व शौचालय जोडणी करणे कामी द्यावयाची रक्कम लाभार्थीच्या खाती जमा केलेबाबत लाभार्थीची पोहोच ठेवली नाही. त्यामुळे रक्कम लाभार्थीच्या खाती जमा झाल्याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक जीएस/2010/प्र.क्र78/योजना-6, दिनांक 10/06/2010 नुसार बायोगॅस संयत्र लाभार्थीची सविस्तर माहिती डेटाबेस संगणकावर तयार करून वेबसाईटवर अपलोड करणे आवश्यक असताना तशी माहिती वेबसाईटवर अपलोड केली नाही.

3) 6 लाभार्थीचे राष्ट्रीय बायोगॅस संयंत्र बांधकाम व शौचालय जोडणी प्रस्तावाची तपासणी केली असता बायोगॅस संयत्र बांधकाम पूर्ण झालेबाबत मुल्यांकन दाखला नाही. बायोगॅस संयंत्रास शौचालयाची जोडणी केलेबाबत शौचालय प्रमाणपत्र नाही, बायोगॅस संयत्राचा फोटो नाही, बायोगॅस संयत्राचा प्रस्ताव अपूर्ण आहे इत्यादी आनियमितता आढळुन आल्या आहेत.

**4.399 कृषी विभागाकडील शिल्लक साहित्याबाबत.**

**पंचायत समिती अलिबाग, जिल्हा रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती, अलिबाग, जिल्हा रायगड अंतर्गत कृषी विभागाची सन 2016-2017 मधील जिल्हा परिषद उपकर निधीमधून प्राप्त झालेले साहित्य लेखापरिक्षण कालावधी अखेरपर्यंत वाटपाअभावी शिल्लक असल्याचे आढळून आले याबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपीए/2008/पृ.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना लाभार्थी निवड व साहित्य खरेदी, वाटप विनियोग इत्यादीची कार्यवाही शासन परिपत्रकात ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार करणे आवश्यक असतांना पंचायत समिती कार्यालयात सन 2016-2017 मध्ये जिल्हा परिषद उपकर निधीमधून खरेदी केलेल्या साहित्य वाटपाअभावी पंचायत समिती कार्यालयात शिल्लक असल्याचे दिसून येते. प्राप्त साहित्य शासन परिपत्रकात नमुद केल्यानुसार वाटप न करणेबाबत खुलासा करून शिल्लक साहित्य विना विलंबात वाटप करून पुर्तता अनुपालन दाखवावे

**4.400 सौरकंदील गरजु शेतक-यांना 50 टक्के अनुदानावर पुरविणे.**

**पंचायत समिती गुहागर, जिल्हा रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 28) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे सदर लाभार्थ्यांना दुबार लाभ दिला किंवा कसे, याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

2) शासन दरकरार केला होता किंवा कसे, याबाबत खुलासा करावा. शासनाचे दरकरार व खुल्या स्पर्धेचा लाभ झाला किंवा कसे, याबाबत खुलासा करावा.

3) सौरकंदील दर्जा व आय एस आय मार्क होते किंवा कसे, याबाबत नस्तीमध्ये कागदपत्रे नाहीत. खुलासा करावा.

4) 100 पैकी 44 सौरकंदील वाटप करण्यात आलेले आहेत. 41 प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. उर्वरीत 59 प्रस्ताव केव्हा प्राप्त झाला? प्रस्ताव न घेताच मागणी कशी करण्यात आली? याबाबत खुलासा करावा.

5) पुरवठा आदेशानुसार 8 दिवसांत साहीत्य पुरवठा करावयाचे असतांना 20 दिवस उशिराने सौरकंदील पुरविलेले आहेत. उशिराने साहित्य पुरवठा केलेबाबत दंडात्मक कार्यवाही केलेली नाही.

**4.401 कृषी विभागाकडील ताडपत्री खरेदीबाबत. (80 टक्के अनुदानावर)**

**पंचायत समिती संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रुपये 498130/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) मंजूर लाभार्थी 190 यांच्या यादीवर तारीख, सभा ठराव नमूद नाही. त्यामुळे यादी केव्हा मंजूर करण्यात आली? याची पडताळणी करता आली नाही.

2) पुरवठा आदेशातील अटी शर्तीनुसार साहित्य पुरवठा 30 दिवसांत करणे आवश्यक असतांना तो 34 दिवस उशिराने करण्यात आलेला आहे. त्याबाबत प्रती दिन दंडाची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

3) लेखापरिक्षण तारखेअखेर म्हणजे दिनांक 21/07/2017 अखेर 28 ताडपत्री शिल्लक आहेत. मागणी नसतांना अनावश्यक खरेदी केल्यामुळे पंचायत समिती सेसची रक्कम रुपये 63,980/- नाहक गुंतून पडलेली आहे.

**4.402 50 टक्के अनुदानावर प्लॉस्टीक ताडपत्री पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती लांजा, जिल्हा रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** 50 टक्के अनुदानावर प्लॉस्टीक ताडपत्री पुरविणेकरीता रक्कम रूपये 1,47,546/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेशामध्ये साहित्य किती दिवसांत पुरवठा करावा, यांची नोंद केलेली नाही. सदर साहित्य विहीत मुदतीत पोहोच झालेबाबत पडताळणी करता आली नाही. याबाबत योग्य तो खुलासा करावा व पूर्तता अनुपालन सादर करावे.

2) विनियोग दाखल्यावर गटविकास अधिकारी यांच्या सहया नाहीत. याबाबत खुलासा करुन पूर्तता करण्यात यावी.

3) मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे सदर लाभार्थ्यांना दुबार लाभ दिला किंवा कसे, याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्याबाबत योग्य तो खुलासा करावा व पुर्तता अनुपालन सादर करावे.

4) दिनांक 06/12/2016 रोजी ताडपत्री प्राप्त झाले आहेत. परंतु, सदर ताडपत्री दिनांक 06/04/2017 रोजी वाटप करण्यात आलेले आहेत. सदर ताडपत्री उशिराने वाटप का करण्यात आले, याबाबत खुलासा करावा.

**4.403 शेतकऱ्यांना 80 टक्के अनुदानावर प्लास्टिक ताडपत्री देणेतील अनियमितता.**

**पंचायत समिती मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रूपये 6,23,591/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजने अंतर्गत प्राप्त केलेल्या वस्तूंचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होणे अपेक्षित आहे. परंतु, विभागाने मात्र खरेदी केलेल्या 442 ताडपत्रीपैकी 254 नग (ताडपत्री) वाटप झाले आहेत व उर्वरीत 188 नग शिल्लक आहेत. त्यामुळे रक्कम रूपये 2,65,236/- किंमतीच्या ताडपत्रींचा विनियोग झालेला नाही.

2) पुरवठादारास रक्कम रुपये 71,628/- प्रदान केली आहे. सदर रक्कमेची पोच पावती अभिलेख्यांत नोंद नाही. आक्षेपित करण्यात येते.

3) पुरवठादार करारातील अटी व शर्तींनुसार सव्याज मागणी करणेपूर्वी रक्कम रूपये 53,016/- पुरवठादारास प्रदान करावी.

**4.404 कृषी विभागाकडील आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत योजना (T.S.P.) या योजनेतून नव्याने बांधण्यात आलेल्या 61 विहीरींच्या कामात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती दिंडोरी, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 29) -** पंचायत समिती, दिंडोरी अंतर्गत कृषी विभागाकडील आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत योजना (T.S.P.) या योजनेतून एकूण 61 विहीरी हया सन 2015-2016 या वित्तीय वर्षात पुर्ण करण्यांत आलेल्या आहेत. त्यावर एकुण रुपये 60,30,000/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालील अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन परीपत्रक क्रमांक जविका/2003/प्र.क्र.96/रोहयो-10, दिनांक 10/10/2004 अन्वये लाभार्थ्यांना शेतीवर विहीर खोदण्याचे / बांधण्याचे काम 14 महिन्यात पुर्ण करावयाचे

असतांना, विहीरी मुदतीत पुर्ण केलेल्या नाहीत. कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद, नाशिक यांनी किमान 5 टक्के विहीरींची तपासणी केलेली नाही.

2) मापन पुस्तिकेत नविन विहीरीची मापे कृषी अधीकारी (विशेष घटक योजना) यांनी नियमानुसार नोंदी पूर्ण झालेवर त्यामध्ये लाभार्थीची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

3) 4 लाभार्थ्यांचे विहीरींचे काम पूर्ण झाल्यावर त्यांच्या नोदी संबंधीताच्या 7/12 उता-यावर घेण्यात आलेल्या नाहीत. कृषी अधीकारी यांचा पूर्णत्वाचा दाखला नस्तीबध्द करण्यात आलेला नाही

4) 5 लाभार्थींचे काम पूर्ण झालेले विहीरींचे छायाचित्र नस्तीबध्द करण्यात आलेले नाही

5) लाभार्थ्यास प्रदान केलेल्या रकमेच्या आधारे विहीर बांधणीमुळे लाभार्थ्याच्या उत्पन्नात वाढ झालेबाबत व योजनेचा फलश्रृती अहवाल संबंधीत ग्रामसेवक / सरपंच यांचेकडून उपलब्ध झाला नाही.

**4.405 पंचायत समिती सेसमधून मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर 5 HP इलेक्ट्रिक मोटर पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती बागलाण, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 40) -** सन 2016-2017 मध्ये पंचायत समिती सेस निधीमधून मागासवर्गीय शेतकर्याना 100 टक्के अनुदानावर इलेक्ट्रिक मोटर पुरविणेकरीता रक्कम रुपये 5,04,000 /- इतका खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अ) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेड पी ए-2008/प्र.क्र. 446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये योजना राबविताना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविणेत आली नाही.

ब) पुरवठादार यांनी पुरवठा आदेशानुसार व योग्य त्या साईजचे साहित्य पुरविलेबाबत देयकावर प्रमाणपत्र नमूद केलेले नाही. त्यामुळे योग्य त्या साईजचे साहित्य मिळालेबाबत खात्री करता आली नाही.

क) दिनांक 31/03/2017 अखेर 12 नग 5 HP इलेक्ट्रिक मोटर शिल्लक असल्याचे आढळून आले. 12 लाभार्थ्यांस साहित्य वाटप न करणे म्हणजेच गरजू लाभार्थ्यांची नावे निवड यादीत घेतली नसल्याचे स्पष्ट होते. शिल्लक साहित्यामुळे मोठ्या प्रमाणावर रक्कम गुंतून पडलेली आहे याबाबत स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

ड) एकूण 12 लाभार्थी यांना इलेक्ट्रिक मोटर देण्यात आलेली आहे. त्यांच्या प्रस्तावांची तपासणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्यात:-

1) उत्तम कचरू साळवे आराई - वय 18 ते 50 वर्षाचे असलेबाबत दाखला नाही. गट विकास अधिकारी / वित्त अधिकारी यांच्या शिफारस असल्याच्या स्वाक्षरी नाही. 7/12 सन 2013 चा आहे. 7/12 वर विहीर असल्याची नोंद नाही. तसेच पाणी कुठून उपलब्ध होणार आहे, याबाबत कोणतेही कागदपत्र नाहीत.

2) राजाराम गोटीराम गवळी केळझर - वय 18 ते 50 वर्षाचे असलेबाबत दाखला नाही. गट विकास अधिकारी / वित्त अधिकारी यांच्या शिफारस असल्याच्या स्वाक्षरी नाही. करारनाम्यावर स्वाक्षरी नाही. तसेच 7/12 वर विहीर असल्याची नोंद नाही. तसेच पाणी कुठून उपलब्ध होणार आहे, याबाबत कोणतेही कागदपत्र नाहीत.

3) दिलीप जेजीराम सूर्यवंशी वाठोडा - वय 18 ते 50 वर्षाचे असलेबाबत दाखला नाही. गट विकास अधिकारी / वित्त अधिकारी यांच्या शिफारस असल्याच्या स्वाक्षरी नाही. 7/12 जोडलेला नाही.

4) बापू श्रावण माळी केळझर - वय 18 ते 50 वर्षाचे असलेबाबत दाखला नाही. गट विकास अधिकारी / वित्त अधिकारी यांच्या शिफारस असल्याच्या स्वाक्षरी नाही. तसेच करारनाम्यावर स्वाक्षरी नाही.

5) सजन नारायण सोनवणे वनोली - वय 18 ते 50 वर्षाचे असलेबाबत दाखला नाही. गट विकास अधिकारी / वित्त अधिकारी यांच्या शिफारस असल्याच्या स्वाक्षरी नाही. करारनाम्यावर स्वाक्षरी नाही. तसेच 7/12 वर विहीर असल्याची नोंद नाही. तसेच पाणी कुठून उपलब्ध होणार आहे, याबाबत कोणतेही कागदपत्र नाहीत.

6) यशवंत सखाराम धिवरे अजमेर सौंदाणे- वय 18 ते 50 वर्षाचे असलेबाबत दाखला नाही. तसेच 7/12 वर विहीर असल्याची नोंद नाही. तसेच पाणी कुठून उपलब्ध होणार आहे, याबाबत कोणतेही कागदपत्र नाहीत.

7) वनाजी बाबुराव चौरे अलियाबाद- वय 18 ते 50 वर्षाचे असलेबाबत दाखला नाही. गट विकास अधिकारी / सभापती यांच्या शिफारस असल्याच्या स्वाक्षरी नाही.

8) कमाल शिवराम शिंदे अलियाबाद- वय 18 ते 50 वर्षाचे असलेबाबत दाखला नाही. गट विकास अधिकारी / सभापती यांच्या शिफारस असल्याच्या स्वाक्षरी नाही. तसेच करारनाम्यावर स्वाक्षरी नाही.

9) दिलीप देवमाण गायकवाड अलियाबाद- वय 18 ते 50 वर्षाचे असलेबाबत दाखला नाही. गट विकास अधिकारी / सभापती यांच्या शिफारस असल्याच्या स्वाक्षरी नाही. तसेच करारनाम्यावर स्वाक्षरी नाही.

10) जेजीराम वारू चौरे अलियाबाद- वय 18 ते 50 वर्षाचे असलेबाबत दाखला नाही. गट विकास अधिकारी /सभापती यांच्या शिफारस असल्याच्या स्वाक्षरी नाही. तसेच करारनाम्यावर स्वाक्षरी नाही.

11) भिका मोतीराम ठाकरे कंधाणे - अलियाबाद- वय 18 ते 50 वर्षाचे असलेबाबत दाखला नाही. गट विकास अधिकारी / सभापती यांच्या शिफारस असल्याच्या स्वाक्षरी नाही. तसेच करारनाम्यावर स्वाक्षरी नाही. तसेच 7/12 वर विहीर असल्याची नोंद नाही. तसेच पाणी कुठून उपलब्ध होणार आहे, याबाबत कोणतेही कागदपत्र नाहीत.

12) रुमाल शिवराम चौरे या लाभार्थ्याचा प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे योग्य लाभार्थ्यास लाभ दिलेबाबत खात्री करता आली नाही.

उपरोक्तप्रमाणे प्रस्तावात अनियमितता आढळून आल्यात. सदर अभिप्रायाची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे. अभिप्रायानुसार अनुपालन पूर्तता न झाल्यास संबधीतांकडून त्यांना दिलेल्या लाभाची वसुली करणे आवश्यक आहे.

**4.406 राष्ट्रीय बायोगॅस खर्चाबाबत.**

**पंचायत समिती साक्री, जिल्हा धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** राष्ट्रीय बायोगॅस प्रकल्पाकरीता रक्कम रूपये 2,67,920/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना सन 2016-2017 साठी असून यासाठी अनुसूचित जाती 03 लाभार्थी, अनुसूचित जमाती 03 लाभार्थी, सर्वसाधारण 18 लाभार्थी असे उद्दीष्ट देण्यात आले होते. याप्रमाणे लाभार्थी मंजूर करुन प्राप्त अनुदान रूपये 2,81,125/- पैकी रुपये 2,67,920/- खर्च करुन रुपये 13,205/- अनुदान परत करण्यात आलेले आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील क्रमांक मागास 1098/प्र.क्र./73/34, दिनांक 20/10/1999 मधील तरतुदीनुसार लाभार्थी निवड ग्रामसभेद्वारे केलेली नाही. तसेच गांवनिहाय नियंत्रण नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे लाभार्थींना शासकिय योजनेचा दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) सदर योजनेसाठी वित्त प्रेषण आदेश क्रमांक 18 दिनांक 11/11/2016 नुसार पंचायत समितीकडे पाठविण्यात आलेले असून सप्टेंबर 2016 ते फेब्रुवारी 2017 प्रत्येक महिन्यासाठी लाभार्थीचे उद्दीष्ट देण्यात आलेले असून यापूर्वी प्रशिक्षण आयोजित करणे आवश्यक असतानां पंचायत समितीने दिनांक 31/01/2017 रोजी प्रशिक्षण आयोजित केलेले आहे. यापूर्वीच दिनांक 21/11/2016 व 16/12/2016 रोजी अनुदान वाटप करण्यात आले आहे. सदर बाब संयुक्तिक नाही.

4) नस्ती सोबतच्या लाभार्थी निवड यादीची पडताळणी केली असता तपशिलात नमूद 4 लाभार्थ्यांच्या नावांसमोर शौचालय जोडणी नाही, असे नमूद असतांना त्यांना प्रमाणक क्रमांक 11 दिनांक 31/03/2017 नूसार प्रत्येकी रुपये 1,200/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये 4,800/- शौचालय जोडणी अनुदान देण्यात आलेले आहे. सदर लाभार्थ्यांच्या प्रस्तावासोबत शौचालय आहे व सयंत्र जोडणी केल्याची पाहणी केल्याचा ग्रामसेवकांचा दाखलाही जोडलेला नाही. या अर्थी सयंत्र जोडणी नसतांना यांना रुपये 4,800/- चे प्रदान करण्यात आलेले आहे. सदरबाबत पंचायत समिती स्तरावरुन चौकशी करण्यात यावी व जादा दिलेले अनुदान रुपये 4,800/- वसुल करण्यात यावे.

5) या योजनेसाठी सर्वसाधारण लाभार्थ्यांस रुपये 9,000/- अनुसूचित जाती / जमातीसाठी रुपये 11,000/- अनुदान देय आहे. 2 लाभार्थींना अनुसूचित जाती / जमातीसाठीचे देय अनुदान रुपये 11,000/- देण्यात आलेले असून

सदर लाभार्थ्यांच्या प्रस्तावास जातीचा दाखला नसल्याने सदर लाभार्थीस रुपये 11,000/- देय नाही. तरी सदर जादा प्रदान रकमेची वसूली करण्यात यावी.

6) लाभार्थी प्रस्तावाची पडताळणी केली असता 14 लाभार्थ्यांच्या प्रस्तावात त्रुटी आढळून आलेल्या असून सदरबाबत चौकशी करण्यात येवून अनुदान मिळण्यास पात्र अटी / शर्तींची पूर्तता झालेली नसल्यास प्रदान अनुदानाची वसूली करण्यात यावी.

7) भारत सरकार बायोगॅस टेक्नोलॉजी डेव्ह ग्रुप न 5-5/2014/ बीई एनबीएमएमपी दिनांक 30/06/2014 नुसार बायोगॅस टर्न कि फी ही बायोगॅस संयत्रे 5 वर्ष सुस्थितीत ठेवण्यासाठी जोडण्यात आलेली आहेत. त्यामुळे बायोगॅस संयत्रे सुस्थितीत ठेवण्यासाठी टर्न कि फी अदा करणे आावश्यक आहे. पर्यवेक्षकीय यंत्रणे बायोगॅस संयत्रे 5 वर्ष सुस्थितीत ठेवणेबाबत तपासणी करुन अहवाल जिल्हा परिषदेस सादर केलेले नाहीत व टर्न कि फी अदा केलेली नाही. त्यामुळे बायोगॅस संयत्रे 5 वर्ष सुस्थिंतीत चालु ठेवणेबाबतचा उद्देश पूर्ण झालेला आहे, हे पंचायत समितीच्या अभिलेखावरुन दिसून येत आहे. नस्तीसोबत जोडलेल्या टिप्पणीनूसार श्री. रविंद्र देवचंद पाटील यांची टर्न फी तत्वावर नियुक्ती प्रस्तावित होती. परंतु, सदर नियुक्ती केली किंवा कसे, याबाबत अभिलेख प्राप्त झालेले नाहीत. तसेच टर्न फी अदा केलेली नाही.

8) फलनिष्पत्ती अहवाल नस्तीसोबत नसल्याने योजना राबविल्याची रक्कम रुपये 2,67,920/- खर्चाची उपयुक्तता पडताळता आली नाही. तसेच एवढी रक्कम खर्च करुनही लाभार्थ्यांचे आवश्यक तेवढे जिवनमान उंचावले किंवा कसे, याची फलनिष्पत्ती अहवाल अभावी पडताळणी करता आली नाही. यामुळे शासनाचा झालेला खर्च निष्फळ झाल्याचे लेखापरीक्षणाची धारणा आहे. प्रस्तुत योजनेंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या लाभातुन त्यांची आर्थिक उन्नती होणे आवश्यक आहे. परंतु, फलनिष्पती अहवाला अभावी सदरबाबत खात्री होत नाही.

**4.407 महिला बालकल्याण विभागाचे रोखकिर्दीच्या न वटलेल्या धनादेशाबाबत.**

**पंचायत समिती नंदूरबार, जिल्हा नंदूरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती, नंदुरबारचे महिला बालकल्याण विभागाचे सन 2016-2017 च्या नमुना नंबर 7 रोखवहीची तपासणी केली असता दिनांक 31/03/2017 अखेर न वटलेल्या धनदेशाची रक्कम रुपये 61,90,573/- इतकी असल्याचे दिसुन येते. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखासंहिता 1968 मधील नियम 31 (1) नुसार सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीची मुदत संपल्यास त्यांचे नुतनीकरण करुन निर्गमित करणे आवश्यक आहे. परंतु, विभागाने रोखकिर्दीस न वटलेल्या धनादेशाचा तपशील नोंदविलेला नसल्याने त्याबाबतची कार्यवाही केल्याबाबतची खात्री करता आली नाही. तरी याबाबतचे अनुपालन दर्शवावे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 57 प्रमाणे बॅकेतील शिल्लक व रोखवहीतील शिल्लक व रोखवहीतील शिल्लक यांच्यातील येणारा फरक सत्वरपणे काढण्याच्या सुचना आहेत. तीन महिन्यापेक्षा अधिक काळ न वटविण्यात आलेले धनादेश वैयक्तिकरीत्या विभाग प्रमुख यांचे निदर्शनास आणण्याबाबत सुचना आहेत. परंतु, अशी कार्यवाही झालेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखासंहिता 1968 मधील नियम 27 नुसार अदात्यास त्वरीत रक्कम प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु, विभागाने या नियमांचे पालन झालेले नाही.

5) रोखवहीत अदत्त (Unpaid cheques) चा मासिकय गोषावारा तपशिल काढलेला नाही. तरी अनुपालन दर्शवावे करावे.

**4.408 100 टक्के अनुदानावर विशेष घटक योजनांतर्गत (SCP) योजनांतर्गत अनुसुचित जाती शेतक-यांना एचडीपीई पाईप पुरविणे योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती अक्राणी (धडगाव), जिल्हा नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** 100 टक्के अनुदानावर विशेष घटक योजनांतर्गत (SCP) योजनांतर्गत अनुसूचित जाती शेतक-यांना एचडीपीई पाईप पुरविणे योजनेवर रक्कम रूपये 3,00,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरच्या योजनेचा पंचातय समिती, धडगांव यांचा तांत्रिक मंजूरीचा आदेश नस्तीसोबत दिसून येत नाही.

2) शासन निर्णय दिनांक 30/07/2016 मधील मार्गदर्शक सुचनानुसार लाभार्थीच्या प्रस्तावासोबत त्यांच्या स्वत:चे नावे शेतजमीन धारणेचा 7/12 किंवा 8 अ जोडलेला नाही. त्यामुळे लाभार्थीचे नावे जमीन असल्याबाबत किंवा एकाच 7/12 वर दोन लाभार्थीना लाभ दिला किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही. 15 लाभार्थीचे प्रस्तावासोबत त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

3) शासन निर्णय दिनांक 30/07/2016 तसेच कृषी आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सुचनानुसार खरेदी करण्यात आलेली नाही.

4) पंचायत समिती स्तरावर एचडीपीई पाईप वाटपाचे नोंदवही नमुना नंबर 33 लेखापरीक्षणात उपलब्ध करण्यात आलेली नाही. त्यामुळे साहित्याचा पुरवठा विहित मुदतीत झाला किंवा कसे, याबाबत पडताळणी करता आली नाही. तसेच लाभार्थीस वाटप कधी व कसा केला? याबाबत साठा नोंदवहीनुसार खात्री पटवावी.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.646/ 269, दिनांक 20/10/1999 अन्वये परिशीष्ट 4 नुसार विवरणपत्र "अ" मध्ये नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे एका व्यक्तीला सदर योजनचा दुबार लाभ दिला किंवा कसे, याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

**4.409 100 टक्के अनुदानावर आदिवासी उपयोजनांतर्गत (TSP) अनुसूचित जमाती शेतक-यांना बैलजोडी पुरविणे योजनेतील गंभीर अनियमितता.**

**पंचायत समिती अक्राणी (धडगाव), जिल्हा नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** 100 टक्के अनुदानावर आदिवासी उपयोजनांतर्गत (TSP) अनुसूचित जमाती शेतक-यांना बैलजोडी पुरविणे योजनेवर रक्कम रूपये 2,21,40,000/- खर्च केला आहे**.** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना राबवितांना विशेष घटक योजनांतर्गत राबविण्यात येणा-या योजनेस पंचातय समिती, धडगांव यांचा तांत्रिक मंजूरीचा आदेश नस्तीसोबत दिसून येत नाही.

2) आदिवासी उपयोजनांतर्गत सन 2015-2016 अंतर्गत मंजूर यादीतील यापुर्वी लाभ घेतलेले तसेच दोन वेळा समाविष्ट झालेल्या 18 शेतक-यांची नावे कृषी अधिकारी (विशेष घटक योजना), पंचायत समिती, धडगांव यांचेकडील दिनांक 19/09/2016 चे कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना सादर केलेल्या पत्रान्वये रदद करण्यात आलेली यादीतील अप्रात्र लाभार्थ्यांना लाभ प्रदान केलेला आहे. तसेच कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक टीएसपी/2015-16 ची मंजूर यादीतील अनुक्रमांक 1 ते 774 अन्वये एकूण 20 लाभार्थ्यांची निवड रदद करण्याबाबत कळविण्यात आलेले असतांना अपात्र तसेच निवड रदद केलेल्या 18 शेतक-यांना बैलजोडीचा लाभ दुबार प्रदान करण्यात आलेला आहे. दुबार प्रदानाची रक्कम शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनेनुसार सदरची रक्कमा सबंधित कृषी अधिकारी यांचेकडून रक्कम रुपये 5,40,000/- वसुल करण्यात येवून शासन सदरी भरणा करण्यात यावी.

3) सदर आदिवासी उपयोजनेत एकाच अपात्र शेतकरी लाभार्थ्यास सन 2015-2016 मध्ये पुन्हा लाभ देतांना वेगवेगळया देयकातून दुबार रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. दुबार प्रदानाची रक्कम सबंधित कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) यांचेकडून रक्कम रुपये 30,000/- वसुल करण्यात यावी.

4) लाभार्थी प्रस्तावांची तपासणी केली असता, लाभार्थीचे प्रस्ताव बैलजोडी खरेदी केल्यानंतर पंचायत समितीकडे सादर करण्यात आलेली आहेत. त्यामुळे दिनांक 30/07/2016 चे शासन निर्णयातील मार्गदर्शक

सुचनानुसार योजना राबविण्यात आलेली नाही. फक्त योजनेचे अनुदान खर्चाचे प्रयोजन ठेवण्यात येवून योजना राबविण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात बैलजोडी खरेदी झाली किंवा कसे, याबाबत संभ्रम दिसून येतो.

5) कृषी आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सुचना दिनांक 06/06/2014 व अंतिम मार्गदर्शक सुचना दिनांक 10/06/2014 तसेच दिनांक 30/07/2016 च्या शासन निर्णयानुसार बैलजोडी खरेदी करण्यापुर्वी पंचायत समिती स्तरावर समिती स्थापन करण्यात येवून समितीचे अध्यक्ष गटविकास अधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना), कृषी अधिकारी (विशेष घटक योजना), पशुधन विकास अधिकारी यांचे उपस्थितीत खरेदी करणे आवश्यक असतांना तशी खरेदी करण्यात आलेली नाही. दिनांक 18/07/2016, 24/10/2016 रोजीची खरेदी ही समितीच्या उपस्थितीत खरेदी न करता वैयक्तिक खरेदी केलेली दिसून येते. सदरची बैलजोडी खरेदी करतांना विक्रेत्यास रक्कम कशी, कोठून व कोणत्या स्वरुपात प्रदान केली? याबाबत लेखापरीक्षणात पडताळणीअंती दिसून येत नाही. त्यामुळे सदरची खरेदीत गैरव्यवहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. बैलजोडी खरेदी केलेबाबत नस्तीसोबत फोटो अंती सदरची खरेदी झाली किंवा कसे, याचा बोध होत नाही.

6) शासन निर्णय दिनांक 30/07/2014 नुसार लाभार्थींना देय अनुदानाची रक्कमा रोख न देता वस्तु स्वरुपात (योजनेतील मंजूर घटक) घावयाची आहे. परंतु, सदरच्या रकमा लाभार्थींच्या खाते वर्ग करण्यात आलेल्या आहेत. शासन निर्णयातील तरतूदींचे उल्लंघन झालेले आहे.

7) शासन निर्णय दिनांक 30/07/2016 मधील परिशीष्ट क्रमांक तीन मधील योजना क्रमांक 4 नुसार बैलजोडी सदृढ व शेती कामात योग्य असल्याबाबत पशुवैघकीय अधिका-याकडून प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना तसे प्रमाणपत्र लाभार्थी प्रस्तावासोबत जोडलेले नाही.

8) शासन निर्णय दिनांक 30/07/2016 मधील मार्गदर्शक सुचनानुसार लाभार्थीच्या प्रस्तावासोबत त्यांच्या स्वत:चे नावे शेतजमीन धारणेचा 7/12 किंवा 8अ जोडलेला नाही. त्यामुळे लाभार्थीचे नावे जमीन असल्याबाबत किंवा एकाच 7/12 वर दोन लाभार्थींना लाभ दिला किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही. लाभार्थींचे प्रस्तावासोबत एकूण 738 लाभार्थीचे प्रस्तावापैकी काही लाभार्थीचे प्रस्तावासोबत त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

9) शासन निर्णय दिनांक 30/07/2016 तसेच कृषी आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सुचनानुसार खरेदी करण्यात आलेली नाही. सदरचा खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/ प्र.क्र.646/269, दिनांक 20/10/1999 अन्वये परिशीष्ट 4 नुसार विवरणपत्र “अ” मध्ये नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे एका व्यक्तीला सदर योजनचा दुबार लाभ दिला किंवा कसे, याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

**4.410 विशेष घटक योजना टी.एस.पी व ओ.टी.एस.पी योजना अंतर्गत लाभार्थींना अर्थसहाय वाटपाबाबत.**

**पंचायत समिती चोपडा, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2016-2017 मध्ये विशेष घटक योजना, आदिवासी क्षेत्राअंतर्गत व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासी शेतक-यांसाठी रक्कम रूपये 20,40,000/- अनुदान प्रदान करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक वि.घ.यो.1516/प्र.क्र.240/4अे, दिनांक 30/06/2016 अन्वये योजने अंतर्गत घेतलेल्या कार्यक्रमाची व लाभार्थींची यादी जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यालय जिल्हाधिकारी, तहसील कार्यालय व जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयात लावणेत येऊन इंटरनेटवर देखील उपलब्ध करून देणेबाबत संचित केलेली आहे. परिशिष्ट ब (चौदा) नुसार योजनेची माहिती सामान्य लोकांना व्हावी, या दृष्टीने योजनेस जास्त प्रसिध्दी देणेबाबत स्वयंसेवी संस्थाशी संपर्क साधून त्यांच्यामार्फत देखील प्रसिध्दी करावी, असे सुचित केलेले आहे. याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

2) उपरोक्त नमूद शासन निर्णयातील परिशिष्ट् चार मधील (दहा) लेखा पध्तीनुसार लाभार्थ्यांना देण्यात येणा-या बाबवार अर्थसहाय्याची लाभार्थी स्तरावर नोंद ठेवण्यासाठी लाभार्थ्यांना नोंद पुस्तिका देऊन अर्थसहाय्यांची

नोंद संबंधीत अधिका-यांनी केलेली नाही. सदर नियमातील तरतुदीनुसार नोंदवही ठेवून अनुपालन दाखवावे जेणेकरुन दुबार लाभ दिला जाणार नाही.

3) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक वि.घ.यो.1516/प्र.क्र.240/4अे, दिनांक 30/06/2016 अन्वये सुचित केल्याप्रमाणे योजनेची मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणेकडुन (third partyevaluation) केलेले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास क्र.1094/ सीआर 2239/ 34/67, दिनांक 01/03/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्यानंतर लाभ दिलेल्या लाभार्थीच्या स्थितीत काय सुधारणा झाली? यांचा अहवाल सादर करणे बंधनकारक असतांना अशा प्रकारचे अहवाल नस्तीसोबत आढळून आले नाहीत. संबंधीत लाभार्थ्यांचे आर्थिक स्थितीचे अहवाल प्राप्त करुन झालेल्या स्थितीबाबत लेखापरिक्षणास अनुपालन दर्शवावे.

**4.411 कृषी विभागाकडील ओटीएसपी व एससीपी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना बैलजोडी अनुदान वाटपाबाबत.**

**पंचायत समिती पाचोरा, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 59) -** पंचायत समिती, पाचोरा ने सन 2016-2017 या लेखापरिक्षण वर्षात कृषी विभागाने ओटीएसपी आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना व विशेष घटक योजनेअंतर्गत आदिवासी शेतक-यांना शेतीसाठी अर्थसहाय्य, त्याचे कृषी उत्पादन वाढीस सहाय्य करुन त्याच्या अर्थिक उन्नतीस मदत करणे या हेतूने सन 2016-2017 मध्ये बैलजोडी घेणेसाठी रक्कम रूपये 14,70,000/- अनुदान प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक विघयो 15-13/प्र.क्र. 240/4-अे, दिनांक 30/07/2016 अन्वये दारिद्रय रेषेच्या वर आणण्यासाठी अनुसुचित जाती उपयोजनातंर्गत शेतक-यांना अर्थ सहाय्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

2) लाभार्थी कुटुंबापैकी कोणीही सदस्य अंगणवाडी सेविका-मदतनीस, शासकीय निमशासकीय नोकरीत नसलेची प्रमाणपत्रे प्राप्त नाहीत. वैयक्तीक लाभार्थी निवडतांना महिला लाभार्थ्यांना प्राधान्य दिलेचे दिसून आलेले नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक दिनांक 20/06/2008 नुसार विहित मुदतीत कार्यवाही झाली नाही.

4) कृषी आयुक्त, पुणे यांचे दिनांक 23/04/2007 नुसार पंचायत समितीनिहाय लाभार्थ्यांना दिलेल्या अनुदानाची नोंदवही ठेवलेली नाही. तसेच उक्त सूचनांनुसार तपासणी अधिकाऱ्यांनी विहित टक्केवारीनुसार तपासणी केली नाही.

5) विशेष घटक, आदिवासी क्षेत्राबाहेरील योजनेतून लाभार्थ्याना बैलजोडी प्रदानाबाबतचे सन 2016 -2017 चे प्रस्ताव तपासतांना आणि 50 टक्के अनुदानावर पंचायत समिती सेसमधून लाभार्थ्याना टू इन वन बॅटरी स्प्रे पंप प्रस्ताव तपासतांना श्री. भानुदास हेमराज ठाकूर, दिघी हे एकच लाभार्थी असतांना त्यांना 2016-2017 या अर्थिक वर्षात दोन्हीही योजनेतून लाभ दिल्याचे आढळून आलेले असून दुबार लाभ दिलेला असलेने संबधीत अधिका-यांची, निवड समितीची, प्रथम दर्शनी जबाबदारी निश्चित होणे आवश्यक असून बैलजोडी प्रदानाची रक्कम रूपये 30,000/- वसुल करावी.

6) नमुद योजनेचे लाभार्थी प्रस्ताव तपासतांना अटी शर्तीनुसार पुर्तता नसलेल्या अयोग्य लाभार्थ्यांना लाभ दिलेचे दिसून येते.

**4.412 ओटीएसपी व एस सी पी योजने अंतर्गत 100टक्के अनुदानावर बैलजोडी पुरविणे बाबत**

**पंचायत समिती भडगाव, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 27) व**

**पंचायत समिती अमळनेर, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 33) -** अहवाल वर्षात पंचायत समिती, भडगावं व अमळनेर यांनी ओटीएसपी योजने अंतर्गत बैलजोडी वाटपावर अनुक्रमे रक्कम रूपये

1,80,000/- व रूपये 5,40,000/- खर्च केला असून त्यांनी एससीपी योजने अंतर्गत अनुक्रमे रक्कम रुपये 8,10,000/- व रूपये 8,10,000 खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2008/ प्रं.क्रं.416 वित्त्-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविणेसाठी वेळापत्रक / वार्षिक नियोजन कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानुसार योजना राबविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामकविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्रक्र73/34, दिनांक 20/10/1999 मधील तरतुदीनुसार लाभार्थी निवड ग्रामसभेव्दारे केलेली नाही तसेच गांवनिहाय नियंत्रण नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही

3) योजना राबविल्यानंतर फलश्रुती अहवाल प्राप्त करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने योजनेचा उददेश सफल झाल्याचे आढळुन आले नाही.

**4.413 ओटीएसपी व एस सी पी योजने अंतर्गत 100 टक्के अनुदानावर बैलजोडी पुरविणे बाबत**

**पंचायत समिती एरंडोल, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** अहवाल वर्षात पंचायत समितीने ओटीएसपी योजने अंतर्गत बैलजोडी वाटपावर रक्कम रूपये 3,00,000/- खर्च केला असुन एकुण 10 लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी रक्कम रूपये 30,000/- लाभ दिलेला आहे. तसेच एस सी पी योजने अंतर्गत बैलजोडी वाटपावर रक्कम रूपये 6,90,000/- खर्च केला असुन एकुण 23 लाभार्थ्यांना प्रती लाभार्थ्यांना रक्कम रूपये 30,000/- प्रमाणे लाभ दिलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2008/प्रं.क्रं.416 वित्त्-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविणेसाठी वेळापत्रक/वार्षिक नियोजन कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानुसार योजना राबविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामकविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्रक्र73/34, दिनांक 20/10/1999 मधील तरतुदीनुसार लाभार्थी निवड ग्रामसभेव्दारे केलेली नाही तसेच गांवनिहाय नियंत्रण नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) योजना राबविल्यानंतर फलश्रुती अहवाल प्राप्त करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने योजनेचा उददेश सफल झाल्याचे आढळुन आले नाही.

4) याबाबत संबधीत लाभार्थी यांचा मागणी अर्ज व प्रस्तावाची पडताळणी केली असता 20 लाभार्थी यांनी मागणी केलेल्या वस्तुचा लाभ न देता बैलजोडीचा लाभ दिला आहे

5) उपरोक्त लाभार्थ्यांना बैलजोडी आवश्यकता नसतांना लाभ दिलेला आहे. यावरुन विभागाने अनुदान खर्ची टाकण्याच्या दृष्टीने सदर लाभ दिलेला आहे. याबाबत खुलासा करुन पुर्तता दर्शवावी

6) श्रीमती सुशिलाबाई दंगा ब्राम्हणे या लाभार्थ्याच्या प्रस्थावाची पडताळणी केली असता त्याचेकडे बैलजोडी नसल्याचे पशुवैदयकिय अधिकारी यांचे प्रमाणपत्र नाही तसेच 7/12 उतारा नाही. नमुना 8, जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला व रहिवाशी दाखला नस्तीसोबत उपलब्ध झाली नाही. त्यामुळे दिलेला लाभ अनुज्ञेय नाही तरी रक्कम रुपये 30,000/- संबधीताकडुन वसुल करुन पुर्तता दर्शवावी

**4.414 राष्ट्रीय बायोगॅस योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती, श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर मधील कृषी विभागाने सन 2016-2017 या वित्तीय वर्षात राष्ट्रीय बायोगॅस योजनेवर रक्कम रूपये 11,17,400/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राप्त तरतूदीपेक्षा रूपये 3,60,200/- कमी खर्च करण्यात आला आहे. सबब अखर्चित रक्कमेचा नियमानुसार दोन वर्षामधे विनियोग करण्यात यावा, अन्यथा रक्कम शासन भरणा करावी.

2) काही लाभार्थ्यांचे प्रतिज्ञापत्र / शपथपत्रे कोरी आहेत. तसेच एका लाभार्थ्याची अर्जावर सही नाही. ही शपथपत्रे नियमोचित ठरत नाही. असे असतानाही नियमबाह्य लाभ प्रदान करण्यात आला. लाभार्थींनी त्यानुसार बायोगॅस योजनेचा अन्य संस्थेकडून लाभ घेतला नसल्याचे व पुढे घेणार नसल्याची हमी समितीकडे प्राप्त झाली नसल्याने, या लाभार्थ्यांस योजनेचा दुबार लाभ प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक बीजीएस-2010/प्र.क्र.78/योजना-6, दिनांक 10/03/2010 मधील परिच्छेद क्रमांक 18 नुसार पंचायतीने लाभार्थीची यादी वेबसाईटवर अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच बायोगॅसचा अनुक्रमांक, जिल्हा, तालुका, अंमलबजावणी यंत्रणा इ. माहिती असलेली धातूची पट्टी प्रत्येक बायोगॅस संयंत्रावर बसविण्यात यावी. पूर्ण झालेल्या बायोगॅस संयंत्रासह घेतलेले लाभार्थ्याचे छायाचित्र प्राप्त करावे केंद्रीय अर्थसहाय्याचे संवितरण नोंदवही ठेवण्यात यावी. या आदेशाप्रमाणे लाभार्थ्यांचे संयंत्रासह घेतलेल्या फोटोवरुन संयत्रावर धातूची पट्टी लावल्याचे दिसून येत नाही. पंचायतीने लाभार्थीची यादी वेबसाईटवर अपलोड केलेली नाही.

4) काही लाभार्थ्यांचे संयंत्र यांसह फोटो नसल्याने, त्यांस प्रत्येकी रूपये 9,000/- अनुदान देय असल्याची खात्री पटली नाही. तरी असे फोटो दर्शवावेत, अन्यथा रक्कम वसूल करुन शासन जमा करण्यात यावी.

5) शासन निर्णय दिनांक 07/02/2015 मधील परिच्छेद क्रमांक 8 नुसार पुर्णत्वाच्या दाखल्याखेरीज अनुदान देण्यात येऊ नये. या तरतूदीनुसार देण्यात आलेल्या दाखल्यांवर नियमीतपणे पुर्णत्वाचा दिनांक नमूद करण्यात आलेला नाही.

6) ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक बीजीएफ-1091/प्र.क्र.380/53, दिनांक 30/11/1991 नुसार लाभार्थ्याकडे किमान चार जनावरे व पुरेसे पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे. याबाबत समितीने काही अर्जातील पशूधन विकास अधिकारी यांचेकडून प्राप्त केलेले सदरचे प्रमाणपत्र कोरे किंवा पशूधन विकास अधिकारी यांची स्वाक्षरी नसलेचे दिसून आले.

7) उक्त निर्णय दिनांक 07/02/2015 मधील परिच्छेद क्रमांक 16 नुसार तालुका स्तरावर गट विकास अधिकारी यांनी 100 टक्के व जिल्हास्तरावर जिल्हा कृषी अधिकारी यांनी 10 टक्के आणि विभागीय स्तरावर सहाय्यक आयुक्त यांनी 2 नावांची तपासणी करावयाची आहे. परंतू, अशी तपासणी करण्यात आली नसल्याचे तपासणी अहवालाअभावी दिसून आले.

8) काही मधील लाभार्थ्यांचे 7/12 वा नमुना 8 उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्यांचेकडे संयंत्रासाठी जागा असल्याचे स्पष्ट होत नाही.

### 4.415 विशेष घटक योजना / टीएसपी / ओटीएसपी योजनेंतर्गत बॅलजोडी / गाडी व पाईप यासाठी प्रदान केलेल्या लाभाबाबत.

**पंचायत समिती श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) व**

**पंचायत समिती पारनेर, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** कृषी संचालनालय, कृषी आयुक्तालय, पुणे यांकडील आदेश क्रमांक 451, दिनांक 25/08/2016 मधील मार्गदर्शक सुचनेतील परिच्छेद क्रमांक 1.1 प्रमाणे लाभार्थीस 6 हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी, 1.2 नुसार जातीचा दाखला, आणि परिशिष्ट-दोन मुद्दा 10 व शासन पत्र क्रमांक विघयो/1002/प्र.क्र.73/भाग1/21ए, दिनांक 13/03/2003 अन्वये किमान 0.40 हेक्टर जमीन आवश्यक आहे. परिच्छेद क्रमांक 1.3 नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द शेतकऱ्यांना उत्पन्नाची अट रूपये 50,000/- (दारिद्र्य रेषेखालील शेतकऱ्यांना उत्पन्नाची अट नाही.) आहे. परिशिष्ट-एक नुसार तुषार / ठिबक सिंचनसाठी रूपये 25,200/-, बैलगाडी, बैलजोडी खरेदीस अनुक्रमे रूपये 15,000/- व रूपये 30,000/- आणि पाईपलाईनसाठी रूपये 20,000/- (300 मीटरपर्यंत) अनुदान अनुज्ञेय राहील. शिवाय परिच्छेद 6.1.2 नुसार नवीन विहीर खोदकाम व बांधकाम यासाठी रूपये 70,000/- ते 1,00,000/- अनुदान देय राहील. मात्र परिच्छेद 6.1.2 नुसार नवीन विहीर व्यतिरीक्त लाभासाठी एकुण रूपये 50,000/- अनुदानाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी संचालनालय, कृषी आयुक्तालय, पुणे यांकडील आदेश क्रमांक 451, दिनांक 25/08/2016 मधील मार्गदर्शक सुचनेतील परिच्छेद क्रमांक 13 व 15 प्रमाणे विविध अधिकाऱ्यांनी करावयाच्या तपासणी संदर्भात अशी कार्यवाही करण्यात आली असल्याची, लेखापरीक्षणास तपासणी अहवाल उपलब्ध न झाल्याने, खात्री पटली नाही.

2) आदेश क्रमांक 576 दिनांक 24/04/2011 मधील मार्गदर्शक सुचनेतील परिशिष्ट 1.4 नुसार बैलजोडीचा विमा उतरविण्यात आलेल्याबाबत निशाणी म्हणून जनावरांचे टॅटुईंग (गोंदवणे) केले जावे. तसेच पोस्ट कार्ड आकारातील बैलजोडीसह लाभार्थ्याचा फोटो काढणे आवश्यक आहे. फोटोमधे जनावरांचे टॅटुईंग (गोंदवणे) केल्याचे दिसून आले नाही.

3) लाभार्थ्याकडे पहिली बैलजोडी नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्रात नमूद नाही. त्यामुळे नियमानुसार लाभ प्रदान करताना संबंधितास प्रथमची बैलजोडी नसल्याची खात्री पटली नाही.

4) मुद्दा क्रमांक 6.5 व 6.6 नुसार महिलांना व अपंगांना(3 टक्के) प्राधान्य देण्यात यावे. असा प्रयत्न केल्याबाबत आवश्यक ते अभिलेखे समितीकडील संचिकेत आढळून आले नाही.

5) पाईप लाईन व विहीरींचे प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे तांत्रिक मान्यता प्राप्तीसाठी पाठविलेले असल्याने, ते लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. तरी सदर प्रस्ताव उपलब्ध करुन दर्शवावेत.

### 4.416 शिल्लक शेती साहित्याबाबत

**पंचायत समिती मिरज, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 25) -** कृषी विभागाच्या साठा नोंदवहीची तपासणी केली असता शेती साहित्य रक्कम रूपये 8,11,400/- चे शिल्लक असल्याचे दिसून आले. उपरोक्त साहित्य पंचायत समिती, मिरज, कृषी विभागाला जिल्हा वार्षिक योजनेतून अपारंपारिक योजना शिर्षाखाली जिल्हा परिषदेकडून सन 2013-2014 या वर्षी प्राप्त झाले आहे.

1) लाभार्थींची मागणी नसताना एवढया मोठया प्रमाणावर खरेदी करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

2) सदर साहित्य चालू स्थितीत आहे किंवा नाही, याबाबतचा अहवाल लेखापरीक्षणास पहावयास मिळाला नाही.

3) योग्य लाभार्थ्यांना सदर योजनेचा फायदा न झाल्याने योजनेचा हेतू सफल न होता, शासनाचा निधी अनावश्यक गुंतून राहिला आहे.

लेखापरीक्षण कालावधीपर्यंत सदर साहित्याचे वाटप करण्यात आलेले नाही. याबाबत योग्य कार्यवाही करून पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

### 4.417 कृषि विभागाकडील शिल्लक साहित्याबाबत.

**पंचायत समिती वाळवा - इस्लामपूर, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 65) -** कृषी विभागाकडील साठा नोंदवहीची पडताळणी केली असता दिनांक 31/03/2017 अखेर रक्कम रूपये 6,63,350/- चे साहित्य साठा नोदवहीस शिल्लक असल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अर्धशासकीय पत्र क्रमांक कपासू-1090/सीआर-280/26 दिनांक 25/07/1991 नुसार कोणत्याही वस्तूची खरेदी जरुरीपेक्षा जादा करू नये, असे नमूद आहे. तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पं.रा.स./1096/प्र.क्र.178, दिनांक 09/10/1997 नुसार लाभार्थ्यांस वस्तुंचे वाटप त्याच वित्तीय वर्षात व वेळेत होणे आवश्यक आहे. तथापि, खरेदी साहीत्य ज्या त्या वर्षात पुरवठा करणे आवश्यक असताना बऱ्याच कालावधीकरीता साहित्य वाटपाविना पंचायत समिती स्तरावर शिल्लक आहे. सदर साहित्य त्वरीत वाटप करुन पुर्तता दाखवावी अन्यथा सदरची रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा केल्याचे चलन लेखापरीक्षणास दाखवावे.

**4.418 राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम**

**पंचायत समिती पलूस, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 39) -** बायोगॅस संयंत्रसाठी एकूण 85 लाभार्थीसाठी रूपये 10,200/- प्रमाणे मंजुर अनुदानापोटी रककम रुपये 8,63,000+15,000 = 10,13,000/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मंजुर यादीप्रमाणे लाभार्थीचे प्रस्ताव यादी व मास्टर नोंदवही पहाता प्रस्तावीत मंजूर यादीमधील लाभर्थीचे नावामध्ये व मास्टर नोंदवहीतील लाभार्थ्याचे नावामध्ये बदल दिसून येत आहे.

मुळ मंजूर लाभार्थ्याच्या यादीमध्ये बदल झालेला आहे. सदर बाब गंभीर व नियमबाहय आहे. मास्टर नोंदवहीत नावात बदल करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे. चुकीच्या व्यक्तीस लाभ दिला असेल, तर संबंधिताकडुन रक्कम वसुलात आणावी.

2) लाभार्थ्याना बायोगॅस संयत्रे हे योग्य प्रकारे वापरली जावीत, यासाठी संबंधित लाभार्थ्याना प्रशिक्षण दिल्याबाबत तसा शासनास अहवाल सादर केल्याबाबत नस्तीसोबत आढळून आला नाही.

3) शासन निर्णयाप्रमाणे उभारलेल्या संयंत्राची तालुकास्तरावरुन 100 टक्के तपासणी गट विकास अधिकारी व जिल्हा स्तरावर 10 टक्के तपासणी कृषी विकास अधिकारी यांनी करावी. तसा अहवाल सादर करावा. असे असताना अशा प्रकारचे लेखे नस्तीसोबत आढळून आले नाहीत.

4) शासन निर्णय क्रमांक बीडीएल/2010/प्रक्र/78/योजना 6, दिनांक 10/03/2010 अन्वये बायोगॅस सयंत्र उभारणीनंतर पुर्णत्वाचा दाखला गट विकास अधिकारी अथवा सक्षम अधिकारी यांनी द्यावा, असे असताना तशी कार्यवाही केलेचे दाखवावे.

5) संबंधित शेतकरी लाभार्थ्यांना लाभ झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र तपासणीच्यावेळी पहावयास मिळाले नाही.

**4.419 विशेष घटक योजनेअंतर्गत नवीन विहिर अनुदान वाटप व इतर बाबींबाबत.**

**पंचायत समिती अक्कलकोट, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती, अक्कलकोट सन 2016-2017 लेखापरीक्षणावेळी कृषी विभागाकडील योजनांची तपासणी केली असता, विशेष घटक योजने अंतर्गत विहिरीसाठी रुपये 57,35,867/- अनुदान प्राप्त झाले असून रक्कम रुपये 43,49,894/- इतके अनुदान वाटप करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक 1089/पक/55/34, दिनांक 05/10/1989 अन्वये वैयक्तीक लाभ देण्यात आलेल्या लाभार्थींची मास्टर नोंदवही वर्षनिहाय व गावनिहाय ठेवणे आवश्यक आहे. ती ठेवणेत आलेली नाही. त्यामुळे एकाच कुटुंबातील एकापेक्षा अनेक व्यक्तींना म्हणजेच दुबार लाभ दिला गेला नसलेबाबतची तपासणी करता आली नाही.

2) नवीन विहिर या योजनेअंतर्गत जे लाभार्थी नवीन विहिर या घटकाचा लाभ घेणार आहेत, त्यांच्यासाठी या योजनेअंतर्गत अनुदानाची कमाल मर्यादा रूपये 1,00,000/- इतकी राहील व नवीन विहिर या घटकाचा लाभ घेणा-या लाभार्थ्यास अन्य कोणत्याही घटकाचा लाभ देय असणार नाही. परंतु, पंचायत समितीने मास्टर नोंदवही न ठेवल्याने वरीलप्रमाणे लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.

3) आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र.विकास/कार्या-1/पंस अक्क्लकोटबोप्र/कावि-82/2017, दिनांक 08/02/2017 अन्वये अक्कलकोट पंचायत समितीमार्फत कृषि विकास विभागाकडून व जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाकडून बोगस प्रकरणे मंजूर झालेबाबत व संबंधीत दोषीवर काय कार्यवाही करण्यात आली? याबाबतचा खुलासा सादर झाला नाही.

4) आयुक्त, पुणे विभाग, पुणे पत्र क्रमांक विकास/कार्या-1/पंस अक्क्लकोटबोप्र/कावि-82/2017, दिनांक 08/02/2017 अन्वये अक्कलकोट पंचायत समितीमार्फत कृषि विकास विभागाकडून बोगस प्रकरणे मंजूर झालेबाबत विशेष घटक योजना सन 2012-2013 ते 2015-2016 मध्ये विहीर योजना रहिवासी नसलेले लाभार्थी संख्या 18 व इतर बाब योजनेतील रहिवासी नसलेले लाभार्थी 78 असे एकूण 96 रहिवासी नसल्यांचे नमूद केले आहे. विशेष घटक

योजनातंर्गत जातीचे दाखले संशयास्पद असलेले 173 इतके आहे व इतर बाब व नवीन विहीर योजना अंतर्गत रहिवासी नसलेले लाभार्थी संख्या 96 इतकी आहे. यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली? याबाबतचा खुलासा सादर झाला नाही.

5) सन 2016-2017 मध्ये सन 2015-2016 मधील मंजूर विहीरींवर किती रक्कम खर्च करण्यात आली व सन 2016-2017 मधील मंजूर विहीरींवर किती खर्च करण्यात आला? याबाबतचा तपशील प्राप्त झाला नाही.

6) विहीर पूर्ण झाल्यावर तलाठी यांच्याकडून सात बारा उताऱ्यावर विहीर नोंद करून घेणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे सदर विहीर त्याच मंजूर गटामध्ये मारल्याची पडताळणी करता आली नाही.

7) जिल्हा परिषदेने आर्थिक वर्षात अनेकवेळा लाभार्थी यादी मंजूर केली आहे त्यामुळे शासन निर्णय दिनांक 20/06/2008 चे पालन झालेले नाही.

**4.420 पंचायत समिती कृषी विभागाकडील नादुरुस्त साहित्याबाबत.**

**पंचायत समिती करमाळा, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 21) -** पंचायत समिती, करमाळा कडील सन 2016-2017 चे कृषी विभागाच्या लेखापरीक्षणावेळी जिल्हा परिषदेकडून जिल्हा परिषद सेस अंतर्गत प्राप्त कृषी अवजारे व अनुषंगिक साहित्याची तपासणी केली असता पंचायत समितीकडे कृषी विभागात गोडाऊनमध्ये साहित्य नादुरुस्त झाले असून विनावापर पडून आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त अवजारे बऱ्याच दिवसापासून पंचायत समितीमधील गोडाऊनमध्ये पडून असून सदरचे साहित्य प्राप्त झाल्यानंतर सदोष साहित्य का स्वीकारले गेले? याबाबत खुलासा सादर करावा.

2) सदरचे साहित्य संबधित पुरवठादाराकडून बदलून घेन्याबाबत काहीच प्रयत्न केलेले दिसून येत नाही ही बाब निश्चितच गंभीर आहे.

3) उपरोक्त सहित्य विनावाटप व विनावापर पडून असल्याने जिल्हा परिषदेची रक्कम रूपये 95,007/- नाहक गुंतून पडलेली आहे. याबाबत पंचायत समितीची उदासीनता दिसून येते.

4) उपरोक्त अवजारे एकूण दहा विनावाटप पडून राहिल्याने लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेले आहे. त्यामुले योजनेचा हेतु सफल होताना दिसत नाही.

तरी उपरोक्त साहित्य परत करुन रक्कम रूपये 95,007/- वसूलात आणून जिल्हा परिषद सेसमध्ये जमा करणे आवश्यक आहे.

**4.421 आदिवासी उपयोजना व विशेष घटक योजनेअंतर्गत शेतक-यांना शेतीसाठी बैलजोडी तसेच नवीन विहिर बांधणे इत्यादी अर्थसहाय्य देण्याची योजना.**

**पंचायत समिती तिवसा, जिल्हा अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** कृषी व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्सव्यवसाय विकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक विघयो/1516/प्र.क्र.240/4अे, दिनांक 30/07/2016 व शासन निर्णय क्रमांक आयुयो/2415/प्र.क्र.243/4अे, दिनांक 16/07/2016 अनुसूचित जाती उपयोजना व आदीवासी उपयोजने शेतक-यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याच्या कार्यक्रमास प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती पत्र क्रमांक 2267 दिनांक 24/11/2016 अन्वये पंचायत समिती तिवसा येथील अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत 69 लाभार्थींची निवड करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निवडक मंजूर लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता खालील अनियमितता निदर्शनास आल्या:-

अ. श्रीमती उषा रमेश बागडे यांचे अर्जासोबत रहिवासी प्रमाणपत्र, बैलजोडी नसल्याबाबत प्रमाणपत्र, कृषी अधिकारी यांचे स्थळ पाहणी अहवालावर स्वाक्षरी नाही.

ब. श्रीमती पंचफुलाबाई रुपचंद पारवे - बैलजोडी विक्री पावतीवर रक्कम नाही. तपासणी प्रमाणपत्र कोरे आहे.

क. श्रीमती रमाबाई देवबाजी काळे- जनावर खरेदी समीतीच्या अहवालावर विक्रेता / खरेदीदार स्वाक्षरी नाही.

2) योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार बैलजोडी खरेदी केल्यानंतर विहित रक्कमेचा विमा काढणे आवश्यक असतांना उपरोक्त नमुद सर्व 12 लाभार्थ्यांनी विमा काढला असल्याबाबत विमा एजंसीची पॉलीसी अभिलेख्यात आढळून आली नाही.

3) संदर्भिय शासन निर्णय दिनांक 30/07/2016 मधील परिच्छेद चार (आठ) नुसार योजने अंतर्गत लाभ दिलेला शेतकरी अर्थ सहाय्याचा दुरुपयोग करणार नाही, यासाठी योजना राबविणाऱ्या अधिका-यांनी वेळोवेळी भेटी देऊन तपासणी करुन दिलेल्या प्रत्येक भेटीची नोंद त्यांच्या दौऱ्यांच्या दैनंदिनीत ठेवावयाची आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याबाबतचे तपशिल अभिलेख्यात आढळुन आले नाहीत.

4) संदर्भिय शासन निर्णय दिनांक 30/07/2016 मधील परिच्छेद चार (दहा) नुसार अर्थसहाय्याची योजनानिहाय, बाबनिहाय व लाभार्थीनिहाय नोंद करण्याकरीता पंचायत समिती स्तरावर रजिस्टर ठेवावयाचे असुन त्यात नोंद घ्यावयाची आहे. कृषी विकास अधिकारी यांनी सदर नोंदवहीची तपासणी करावयाची असून लाभार्थी स्तरावरही नोंद ठेवण्यासाठी लाभार्थींना नोंद पुस्तिका द्यावयाची आहे व त्यात दिलेल्या अर्थसहाय्याची नोंद घ्यावयाची आहे. त्यानुसार पंचायत समिती स्तरावर लाभार्थींची नोंदवही ठेवण्यात आलेली आहे. तथापि, तपासणीबाबतचे अभिप्राय / शेरा नोंदविण्यात आलेले नाहीत. शासन निर्णयानुसार परिपुर्ण कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

5) योजना पूर्णपणे कार्यान्वीत झाल्यांनतर लाभार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीत काय सुधारणा झाल्या, याबाबत सक्षम अधिका-यांच्या स्वाक्षरीनिशी फलश्रृती अहवाल सादर करण्यात आला असल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले नाही.

6) संदर्भिय शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 8 नुसार या योजेनचे त्रयस्थ यंत्रणेमार्फत मुल्यमापन करुन घेतल्याबाबत दस्तऐवज अभिलेखात आढळुन आले नाही.

**4.422 जिल्हा परिषदेकडून प्राप्त साहित्य लाभार्थींना वाटप न करणेबाबत.**

**पंचायत समिती अकोट, जिल्हा अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती, अकोट सन 2016-2017 चे लेखापरिक्षणाचे वेळी पंचायत विभाग व कृषी विभागाच्या साठा नोंदवहीची पडताळणी केली असता त्यामध्ये साहित्य लाभार्थींना वाटप न करता शिल्लक असल्याचे दिसुन आले.

अ) पंचायत विभागाची साठा नोंदवही उपलब्ध झाली नाही. दिनांक 12/01/2017 रोजी गोडाऊनची श्री.एस.व्ही.सिरसाट, कनिष्ठ अभियंता, श्री.टि.एम.ढेरे, स्था.अ.स., श्री.रविकिरण खेडकर, क.स., पंचायत समिती, अकोट या पंचासमक्ष पडताळणी करुन शिल्लक साठा श्री.एस.जी.दातकर, क.स., पंचायत समिती, अकोट यांच्या ताब्यात दिल्याचा अहवाल आहे.

यापैकी ब्लॅकेट बंडल 14 नग दिनांक 28/04/2017 रोजी श्री. शिरसाट, शाखा अभियंता बांधकाम यांना दिले. साठा नोंदवही उपलब्ध झाली नसल्याने सदर शिल्लक साहित्य कधी प्राप्त झाले होते, याबाबत माहिती उपलब्ध झाली नाही.

ब) कृषी विभाग, पंचायत समिती, अकोट साठा नोंदवहीची पडताळणी केली असता कृषी विभाग, जिल्हा परिषद, अकोला यांचेकडुन दिनांक 31/03/2016 रोजी प्राप्त झालेल्या साहित्यापैकी साहित्य लेखापरिक्षणाचे दिनांकापर्यंत म्हणजेच ऑगस्ट 2017 पर्यंत शिल्लक होते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त करुन घेवून मागणी निश्चित न करता जिल्हा कार्यालयकडे अवास्तव मागणी नोंदविल्याने साहित्य शिल्लक राहिल्याचे दिसुन येते.

2) पंचायत विभागाची साठा नोंदवही उपलब्ध झाली नसल्याने सदर साहित्य किती वर्षापासुन पडून आहेत, याबाबत माहिती मिळू शकली नाही. सदर साहित्य पडून राहिल्याने निकामी होवू शकते. जसे लेडीज सायकली जंग लागुन निकामी होवू शकते.

3) उपरोक्त साह्तित्य वाटप न केल्याने लाभार्थी लाभापासुन वंचित राहिले. त्यामुळे योजना राबविण्याचे उद्देश सफल झाले नाही.

**4.423 विशेष घटक योजना अंतर्गत सन 2015-2016 च्या लाभार्थ्यांना बैलबंडी, तिनदाती सीड ड्रील, नॅपसॅक स्प्रेअर व पॉवर स्प्रेअर देणेबाबत.**

**पंचायत समिती तेल्हारा, जिल्हा अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, तेल्हारा येथील सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात कृषी विभागाने सन 2015-2016 च्या लाभार्थ्यांना बैलबंडी, पॉवर स्प्रेअर, तिनदाती सीड ड्रील, कल्टीवेअर, नॅपसॅक स्प्रेअर इत्यादी शेतीची अवजारे लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. सदरबाबत प्रमाणक क्रमांक 207, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 13,36,500/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थीचे अर्ज लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसारच लाभार्थ्यांची निवड केली अथवा नाही, याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) लाभार्थ्याचे कृषी अवजारे खरेदी करण्यासाठी पुर्व समंती अर्ज घेणे आवश्यक असतांना लेखापरिक्षणात उपलब्ध न झाल्याने लाभार्थ्यांकडुन पुर्वसमंती अर्ज घेतले अथवा नाही, याबाबत पडताळणी करता आली नाही.

3) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2016/प्र क.301/11-अ, दिनांक 21/01/2017 मध्ये अनुक्रमांक 1 ते 6 मध्ये नमुद केलेल्या थेट हस्तांतरण कार्यपध्दतीचा अवलंब करुन लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देऊन योजनेची फलश्रृती झाली, याबाबत खात्री पटवावी.

**4.424 पंचायत समिती उपकर योजने अंतर्गत 75 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना एच.डी.पी.ई. पाईप पुरविणे.**

**पंचायत समिती वाशिम, जिल्हा वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 47) -** पंचायत समिती, वाशिम यांनी सन 2016-2017 मध्ये पंचायत समिती उपकर योजने मधुन मागासवर्गीय शेतकऱ्यांना 75 टक्के अनुदानावर एच.डी.पी.ई. पाईप पुरविणे योजनेवर रक्कम रूपये 5,99,824/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती अधिनीयम 1968 नियम 50(4) नुसार नमुना 10 अन्वये लाभार्थी हिश्याचे रक्कम जमा करुन लाभार्थीस नमुना 10 च्या पावती देवुन प्राप्त रक्कम रोखपुस्तकात जमेस घेवुन एकत्रीत रककमा चालानद्वारे भरणा करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) साहित्य प्राप्त झाल्याची वाहन पावती लेखापरीक्षणास प्राप्त झालेली नाही.

3) साहित्य 03/12/2016 ला प्राप्त झालेले आहे. देयकावर साहित्य प्राप्त झाल्याबाबतची नोंद आहे. मात्र किती नग प्राप्त झालेले आहेत व सुस्थितीत प्राप्त झालेले आहेत, याबाबतची शेरा तसेच गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

4) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 मधील नियमपुस्तीका नियम 3.2.2 नुसार सदर खरेदीसाठी खरेदी अधिकाऱ्यांने खरेदी केलेली वस्तु मागणी केलेल्या गुणवत्तेची व सध्याच्या बाजारभावानुसार असल्याचे प्रमाणित करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

5) नस्तीमध्ये साहित्याचे गुणवत्ता तपासणी प्रमाणपत्र हे कृषी विकास महामंडळ यांचे आहे. मार्गदर्शक सुचना क्रमांक 11 नुसार गुणवत्ता तपासणीकरीता कृषी विकास अधिकारी यांनी एकत्रीतपणे नमुद टक्केवारीनुसार रॅण्डम पद्धतीने नमुने काढावेत व तपासणीसाठी कृषी विद्यापीठ /शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय पाठविण्यात यावी. मात्र याप्रमाणे साहित्य प्राप्त झाल्यानंतर शासकीय प्रयोगशाळेकडुन तपासणी प्रमाणपत्र / गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त करवुन घेतलेला नाही.

6) तसेच निवडक लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता लाभार्थी निवड ही ग्रामसभेत झाली असल्याबाबतचा ठराव किंवा सचिव यांचे यापुर्वी योजनेचा लाभ घेतलेला नसल्याचे प्रमाणपत्र लाभार्थी अर्जाला आढळुन आलेले नाही.

7) निवडक लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता 6 लाभार्थी एकाच कुटुंबातील असण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत खात्री पटवावी.

8) साहित्य वितरीत केल्यानंतर सदर योजनेचा उद्देश सफल झालेला असल्याबाबत केलेली तपासणी अहवाल नाही. योजनेची फलश्रुती झालेली आहे अथवा नाही, याची खात्री केलेली नाही.

**4.425 पंचायत समिती उपकर योजनेअंतर्गत 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीय शेतक-यांना डिझेल इंजिन पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मालेगांव, जिल्हा वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 24) -** उपरोक्त प्रमाणकान्वये पंचायत विभागाने पंचायत समिती उपकर योजनेअंतर्गत 18 नग डिझेल इंजिन खरेदी करण्याकरीता रुपये 4,75,200/- खर्च केल्याचे दिसुन येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क. 446/वित्त / 9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदांनी योजना राबवितांना विहित वेळापत्रकानुसार योजन राबविणे आवश्यक असतांना शासन परीपत्रकातील परीशिष्ट ई मध्ये नुमुद केलेल्या सुचनेनुसार योजना राबविल्याचे दिसुन येत नाही

2) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृओ-2015/ प्र.क्र.218/11-अे, दिनांक 23/11/2015 च्या मागदर्शक सुचना प्रपत्र-2 मधील बाब क्रमांक 13(3) नुसार सन 2016-2017 करीता विविध योजनांतर्गत पुरविण्यासाठी निश्चित करण्यांत आलेल्या कृषी अवजारे/उपकरणे यांच्या किमान दरानुसार निश्चित केलेल्या दराची माहिती तसेच पुरवठादाराची अंतिम केलेली यादी व पुरवठयाचे दर इत्यादी माहिती तालुका, जिल्हा व विभाग या सर्व कार्यालयाचे सुचना फलकावर लावावी, जेणेकरुन शेतक-यांना त्यांच्या पसंतीनुसार कृषी अवजारांची मागणी करणे सोईचे होईल. परंतु, अशी कार्यवाही केल्याबाबतचे दस्तावेज लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. जर अशी कार्यवाही केली असती, तर साहीत्याची खरेदी करण्यांपुर्वी अनेक शेतक-यांचे वेगवेगळया साहित्य मागणीचे अर्ज पंचायत समितीस प्राप्त झाले असते. परंतु, शेतक-यांचे साहित्य मागणी अर्ज साहित्य खरेदीपुर्वी प्राप्त न होता साहित्य खरेदी केल्यानंतर प्राप्त झाल्याचे पंचायत समितीच्या आवक क्रमांक व दिनांकावरुन दिसुन येते. त्यामुळे शेतक-यांनी आपले पंसतीनुसार साहित्य मागणी न करता, त्यांना पंचायत समितीने खरेदी करुन ठेवलेल्या साहित्याची अर्जात मागणी करावी लागली. यावरुन सदर योजना नियमानुसार राबविल्याचे दिसत नाही.

3) साहित्याची खरेदी करण्यांपुर्वी पुरवठादाराकडुन करारनामा करुन घेणे आवश्यक आहे त्याप्रमाणे पंचायत समितीने पुरवठादाराकडुन रूपये 100/- च्या स्टँप पेपरवर करारनामा करुन घेतल्याचे दिसते. परंतु, सदर करारनामा साहीत्य खरेदी करण्यापुर्वी न करता साहित्य खरेदी केल्यानंतर केल्याचे दिसुन येते. कारण स्टँपपेपरवर स्टँपपेपर खरेदीचा दिनांक 16/08/2016 दर्शविण्यांत आला आहे. त्यामुळे साहित्य खरेदी केल्यानंतर संबंधीत पुरवठादारासोबत करारनामा करण्याचे काय प्रयोजन होते, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) एकुण प्राप्त 18 अर्जापैकी फक्त 8 अर्जावर आवक क्रमांक व दिनांक नमुद असुन सदर अर्ज साहित्य खरेदी केल्यानंतर पंचायत समितीला प्राप्त झाल्याचे दिसुन येते. परंतु, 10 अर्जावर आवक क्रमांक व दिनांक नमुद नाही. त्यामुळे सदर अर्ज पंचायत समितीला केव्हा प्राप्त झाले, याची सत्यता पडताळता येत नाही. सबब याबाबत खुलासा करावा. खालील अर्जावर आवक क्रमांक व दिनांक नमुद नाही.

5) श्री. हरीचंद्र ग्यानुजी गवई यांचे 7/12 मध्ये विहीरीचा उल्लेख आहे. परंतु, सदर 7/12 मध्ये एकापेक्षा जास्त शेतक-यांचे नांवे असुन विहीर ही हरीचंद्र यांचे नावावर नसुन दुसयाचे नांवावर आहे. त्यामुळे संबंधीतांचे विहीरीवरुन श्री. हरीचंद्र यांना पाणीपुरवठा करण्यांस संमती दिल्याबाबतचे संमतीपत्र आवश्यक आहे परंतु, तसे कोणतेही संमतीपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. सिंचनाची व्यवस्था असल्याशिवाय सदर योजनेचा लाभ देता येत नाही. परंतु, संबंधीताकडे स्वतःचे नावाने सिंचनाची व्यवस्था नसतांना त्यांना या योजनेचा लाभ दिल्याचे दिसुन येते.

6) राहुल वानखडे व हरीचंद्र गवई यांची अर्जावरील स्वाक्षरी व सहित्य घेतल्याबाबत साठा नोंदवहीवर केलेली स्वाक्षरी यामध्ये फरक दिसुन येते. त्यामुळे ज्या पात्र लाभार्थ्यांने अर्ज केलेला आहे, त्याच लाभार्थ्यांना सदर

साहित्य प्राप्त झाले किंवा कसे, याबाबत खात्री करता येत नाही. सबब साठा नोंदवहीमधील स्वाक्षरी अर्जदारांचीच असल्याची खात्री पटवावी.

7) सन 2015-2016 ते 2016-2017 या कालावधीत लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांची नांवे मास्टर नोंदवहीमध्ये नमुद केलेली नाही. त्यामुळे संबंधीत लाभार्थ्यांना दुबार लाभ देण्याची शक्यता नाकारता येत नाही

**4.426 विशेष घटक योजना अनुसूचित जाती (SCP) उपयोजना अंतर्गत लाभार्थ्यांना बैलजोडी खरेदी केलेबाबत.**

**पंचायत समिती रिसोड, जिल्हा वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 58) -** पंचायत समिती, रिसोडचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणमध्ये विशेष घटक योजनेंतर्गत अनुसुचित जाती (SCP) अंतर्गत लाभार्थ्यांना बैलजोडी वाटप करण्यात आले आहे.

अनुसुचित जाती उपयोजना अंतर्गत बैलजाडी खरेदीवरील सन 2016-2017 मधील खर्च बैलजोडी खरेदी सन 2015-2016 एकुण 265 लाभार्थी प्रदान रक्कम रूपये 79,50,000/-

ओ.टी.एस.पी अंतर्गत बैलजाडी खरेदीवरील सन 2016-2017 मधील खर्च बैलजोडी खरेदी सन 2015-2016 एकुण 01 लाभार्थी प्रदान रक्कम रूपये 30,000/- असे एकुण रक्कम रुपये 79,80,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जनावर खरेदी करताना सक्षम अधिकाऱ्याची उपस्थिती नसल्याचे आढळून येते.

2) जनावर खरेदी करताना खरेदीदार आणि विक्रीदार यांचा बैलजोडी बरोबर फोटो नसल्याचे आढळून आले आहे.

3) लाभार्थ्याची बैलजोडी मागणी करतानाचा अर्ज कोरा आढळून आला आहे.

4) जनावर खरेदी करताना तपासणी करावयाचे प्रपत्र 2 अ - सर्व लाभार्थ्यांचे कोरे आढळून आले आहे, तपासणी झाली किंवा कसे? खुलासा होणे आवश्यक आहे.

5) बैलजोडी ताबा पावती कोरी असल्याचे आढळून आले आहे.

6) खरेदी समिती अहवालामध्ये बैलजोडीचे वर्णन करण्यात आले नाही, तरी सुद्धा संबधित अधिकाऱ्यांनी त्यावर सह्या केल्या आहेत.

7) बैलजोडी वाटप केल्यानंतर लाभार्थ्याच्या आर्थिक परिस्थतीत किती सकारात्मक बदल झाला, याबाबत फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

8) बैलजोडी वाटप केल्यानंतर ग्रामपंचायतीच्या जनावर साठा नोंदवहीचे पानाची झेरोक्स प्रत लेखापरीक्षणास आढळून आली नाही.

9) बैलजोडी वाटप केल्यानंतर लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्याकडे वाटप केलेली बैलजोडी कार्यरत असल्याबाबत आणि ताब्याबाबत तपासणी होणे आवश्यक आहे.

10) एकूण लाभार्थ्यापैकी शासन नियमानुसार 30 टक्के महिलांना आणि 3 टक्के अपंगाना लाभ देणे आवश्यक आहे. एकूण किती महिलांना व अपंग लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला, याबाबत माहिती सादर करावी.

**4.427 पंचायत समिती सेस योजना अंतर्गत 75 टक्के अनुदानावर शेतक-यांना ताडपत्री वाटप योजनेतील खर्चातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती मानोरा, जिल्हा वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती, मानोरा चे सन 2016-2017 चे लेखापरिक्षणाचे वेळी पंचायत समिती सेस फंडामधून कृषी विभागा अंतर्गत सर्वसाधारण शेतक-यांना 75 टक्के अनुदानावर तांडपत्री वाटपाबाबतची कृषी अभिवृध्दी व सुधारणा योजना राबविण्यात आली आहे. योजनेचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यात आले असुन त्यानुसार पंचायत समिती कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागातील सर्व साधारण शेतक-यांना जास्तीत जास्त प्रमाणात लाभ मिळण्यांचे हेतुने योजना राबविण्यात आली आहे. सदरबाबत रक्कम रुपये 3,48,166/- खर्च करण्यात आला आहे. योजना राबवितांना ठरवुन दिलेल्या

पात्रता नुसार योजना राबवावयाची असतांना त्यानुसार कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिसुन येते याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठादाराला लाभार्थी हिस्सा 25 टक्केची रक्क्म लेखापरिक्षण दिनांकापर्यंतही प्रदान करण्यात आल्याचे दिसुन येत नाही.

2) लाभार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी केली असता खालील अनियमितता आढळुन आल्या आहेत.

1. श्री.भगतसिंग हिरासिंग राठोड रा. वाई व श्री.अक्षय भगत सिंग राठोड, रा. वाई हे एकाच कुंटुबातील असल्याचे दिसुन येते. त्यामूळे एकाच कुटुबांला एकाच वित्तीय वर्षात दोनदा लाभ दिल्याचे दिसुन येते अर्जासोबत गटविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र कोरे आढळुन आले आहे.

2. श्री.रमेश पांडुरग राठोड, रा. हापडा, श्री संदीप धनुसिंग राठोड रा.धानोरा, श्री.उल्हास चव्हाण, धानोरा यांचा करारनामा कोरा असल्याचे दिसुन येते.

3. श्री.आनंदा राठोड, रा.फुलउमरी यांचे 8 अ वर आनंदा वंजारा, असे नमुद आहे.

4. श्री.वामन देविसिंग राठोड, फुलउमरी चेअर्जासोबत 7/12 व 8अ नाही.

5. श्री.सुरेश हेरोडे हळदा यांचे अर्जावर अर्जदाराची स्वाक्षरी नाही.

6. श्री.गजानन रामजी राठोड यांचे अर्जासोबत कागदपत्रे नाहीत.

3) उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यांत आलेले नाही. तसेच मास्टर नोंदवही ठेवण्यांत आलेली नसल्याने एकाच व्यक्तीस दुबार लाभ दिल्याची शकयता नाकारता येत नाही.

4) पुरवठादाराने साहित्याचा पुरवठा करतांना साहित्याची तपासणी सक्षम संस्थेमार्फत करुन घेतल्याबाबत अहवाल देणे आवश्यक असतांना तसा तपासणी अहवाल नस्तीसोबत / देयकासोबत आढळुन आला नाही. वरील बाबींवरुन गरजु शेतक-यांना लाभ मिळण्याचे उददेशाने जरी योजना असली तरी, योजना योग्यरित्या राबविण्यात आल्याबाबत व योजनेचा लाभ गरजु लाभार्थ्यांना झाल्याबाबतचे आढळुन येत नाही.

**4.428 कृषी विभागाकडील विशेष घटक योजना  व ओटीएसपी अंतर्गत तुषार संच वाटप योजनाबाबतची अभिलेखे लेखापरिक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याबाबत.**

**पंचायत समिती मानोरा, जिल्हा वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती, मानोरा येथे कृषी विभागाकडील तुषार संच वाटप योजनेवर सन 2016-2017 मध्ये ओटीएसपी मधुन प्रमाणक क्रमांक 105, दिनांक 31/03/2017 अन्वये रुपये 40,000/- व एससीपी मधुन प्रमाणक क्रमांक 106, दिनांक 31/03/2017 अन्वये रुपये 4,15,728/- असा एकुण रुपये 4,55,728/- एवढा खर्च झाल्याचे आढळून आले. त्याबाबतची संपुर्ण अभिलेखे लेखापरीक्षणास तपासणीकरीता उपलब्ध करुन देण्यांबाबत मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, 1930 चे नियम 6 अन्वये, पत्र क्रमांक 01 दिनांक 31/08/2017 तसेच अर्धसमास पत्र क्रमांक 06, दिनांक 26/09/2017 ने अभिलेख्यांची मागणी करण्यांत आली. परंतू, वारंवार मागणी करुन सुध्दा सदर योजनेबाबतची कोणतीही अभिलेखे लेखापरीक्षणास तपासणीसाठी उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे सदर योजनेचे लेखापरिक्षण करता आले नाही. मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, 1930 चे नियम 4 अन्वये लेखापरिक्षणाकरीता संपुर्ण अभिलेखे उपलब्ध करुन देणे ही, पंचायत समितीची जबाबदारी आहे. परंतू, अभिलेखे लेखापरीक्षणास तपासणीकरीता उपलब्ध न केल्यांस, मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम,1930 चे नियम 7 (सुधारीत अधिनियम, 2011 चे नियम 8) अन्वये कार्यवाही करण्यांचे सुचविले आहे. तरी नियमानुसार कार्यवाही करुन अनुपालन करावे.

**4.429 पंचायत समिती सेस योजना अंतर्गत 90 टक्के अनुदानावर अल्पभुधारक शेतक-यांना ताडपत्री वाटप योजनेतील खर्चातील अनियमितताबाबत**

**पंचायत समिती कारंजा, जिल्हा वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 34) -** पंचायत समिती, कारंजा चे सन 2016-2017 चे लेखापरिक्षणाचे वेळी पंचायत समिती सेसफंडामधून समाजकल्याण विभाग अंतर्गत

मागासवर्गीय अल्पभुधारक शेतक-यांना ताडपत्री वाटपबाबतची योजना राबविण्यात आली आहे. सदरबाबत रक्कम रुपये 2,48,746/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजना राबवितांना ठरवुन दिलेल्या पात्रतानुसार योजना राबवावयाची असतांना त्यानुसार कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिसुन येते.

2) पुरवठादाराला लाभार्थी हिस्सा 10 टक्केची रक्कम लेखापरिक्षण दिनांकापर्यंतही प्रदान करण्यात आल्याचे दिसुन येत नाही.

3) साठा पंजीची पडताळणी केली असता, पुरवठादाराने विहीत मुदतीत 112 ताडपत्रीचा पुरवठा केला असतांनाही प्रत्यक्ष लेखापरिक्षण दिनांकापर्यत 42 ताडपत्रीचे वाटप लाभार्थ्यांना करण्यात आल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे 42 ताडपत्री गोदामतच पडुन असल्यसाचे दिसुन येते. ज्या गरजु शेतक-यासाठी योजना राबविण्यात आली, त्या गरजू अल्पभूधारक शेतक-यांना योजनेचा लाभ झाल्याचे दिसुन येत नाही.

4) ताडपत्री साहित्य वाटप करताना दिनांक टाकण्यात आली नाही. त्यामुळे लाभार्थ्याला ताडपत्री कधी वाटप करण्यात आली, याबाबत आकलन होत नाही. तसेच साठा नोंदवहीच्या नोंदी पूर्ण करण्यात आल्या नाहीत.

5) लाभार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी केली असता सौ. भुरीबाई रावसाहेब पवार यांचे रेशनकार्डवर त्यांचे नाव नमुद नसुन शोभा रावसाहेब पवार, असे नमुद आहे. त्यामुळे त्यांना कसा लाभ दिला, याबाबत खात्री होत नाही

6) योजनेच्या अटी व शर्ती नुसार उत्पन्नाची अट कायम आहे, असे असतांनाही बुध्दु छोटु दगैवाले अनई यांचा उत्पन्नाचा दाखला नाही

7) श्री. संजय सिताराम राठोड, श्री. प्रकाश रोठोड पोहा, श्री अरविंद मनवर, विजय राठोड, विजय जगन्नाथ राठोड, पुजा राजेंद्र झारे श्री साहेबराव निचळ, श्री डिगाबराव वाकोडे यांच्या अर्जासोबत लावण्यात आलेले दाखले कोरे असल्याचे दिसुन येते.

8) श्री. अशोक सिताराम हिरते व श्री. इश्वर प्रल्हादराव मडावे कार्ली यांचा करारनामा कोरा असल्याचे दिसुन येते.

9) लाभार्थी यादी मंजुर करुन लाभ प्रदान करणे आवश्यक असतांना लाभार्थी यादीला मंजुरी प्रदान नसल्याचे दिसुन येते

10) उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यांत आलेले नाही. तसेच मास्टर नोंदवही ठेवण्यांत आलेली नसल्याने एकाच व्यक्तीस दुबार लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरील बाबीवरुन गरजु अल्पभुधारक शेतक-यांना लाभ मिळण्याचे उददेशाने जरी योजना असली तरी, योजना योग्यरीत्या राबविण्यात आल्याबाबत व योजनेचा लाभ गरजु लाभार्थ्यांना झाल्याबाबतचे आढळुन येत नाही.

**4.430 पंचायत समिती सेसफंडा अंतर्गत 75 टक्के अनुदानावर ताडपत्री पुरविणे खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती पांढरकवडा, जिल्हा यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती, पांढरकवडा येथील सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात पंचायत समिती सेस फंडातुन 14 समाजकल्याण लेखाशिर्षक अंतर्गत 75 टक्के अनुदानावर ताडपत्री पुरविणेवर प्रमाणक क्रमांक 5, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 1,90,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन दर करार क्रमांक HDPE tarp/c-2/rc-rbod0000/0615/06438/763/60138, दिनांक 19/08/2016 दिनांक 31/10/2016 पर्यत वैध आहे व पुरवठा आदेश दिनांक 05/10/2016 रोजी देण्यात आला. दरकराराप्रमाणे ताडपत्रीचे दर रुपये 3,290.60 आहेत. प्रत्यक्ष खरेदी रूपये 4,322/- प्रती नगाप्रमाणे जादा दर रूपये 1030.40 एकुण 55 नग ताडपत्रीचे रूपये 56,727/- जादा प्रदान करण्यात आले आहेत. जादा प्रदान रक्कम रूपये 56,727/- बाबत संबंधितावर जबाबदारी निश्चीत करुन वसुल करण्यात यावी.

2) 55 नग ताडपत्रीचे रूपये 3290.60 प्रमाणे रूपये 1,80,983/- चे 75 टक्के रक्कम रूपये 1,35,737/- अदा करणे आवश्यक असतांना प्रत्यक्ष प्रदान रूपये 1,90,000/- करण्यात आले. जादा प्रदान रक्कम रूपये 54,263/- बाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करण्यात यावी.

3) पुरवठा आदेश अट क्रमांक 5 अन्वये ताडपत्रीचा चाचणी अहवाल सादर करणे आवश्यक असतांना चाचणी अहवाल नस्तीत आढळला नाही.

4) पुरवठा आदेशान्वये साहित्य दिनांक 13/10/2016 पर्यत पुरवठा करणे आवश्यक असतांना दिनांक 20/10/2016 ला साहित्याचा पुरवठा करण्यात आला.

5) 25 टक्के लाभार्थी हिस्सा जमेबाबत चलान नस्तीत आढळली नाही.

6) पंचायत समिती स्टॉकबुक पान क्रमांक 175 वर नोंद असलेबाबत मुळ देयकावर नमुद आहे. परंतु, स्टॉकबुक लेखापरिक्षणास सादर करण्यात आले नाही.

7) लाभार्थी अर्ज लेखापरिक्षणात उपलब्ध करण्यात आले नाही.

8) वर्ष व योजनानिहाय मास्टंर नोंदवही ठेवण्यांत आलेली नाही. त्यामुळे दुबार लाभ दिला जाण्याची शक्यंता नाकारता येत नाही.

9) पुरवठा आदेश बॅग पार्लरचा करुन त्यावर उपरिलेखन करुन नंतर साई एरिगेशनचे नाव लिहीण्यात आले याबाबत लेखापरिक्षणास खुलासा सादर करण्यात यावा.

**4.431 पंचायत समिती सेस 11 कृषी अंतर्गत कास्तकाराना 50 टक्के सुटीवर एच डी पी ई पाईप पुरवठा खर्चातील अनियमीतता.**

**पंचायत समिती मोताळा, जिल्हा बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** कृषी अंतर्गत कास्तकाराना 50 टक्के सुटीवर एच डी पी ई पाईप पुरवठाकरण्याकरीता रक्कम रूपये 9,98,844/- खर्च झाला आहे. सदर योजना सन 2015-2016 या वित्तीय वर्षात तरतुद करुन राबविण्यात आली नाही. पुर्ण योजना सन 2016 अखेर सुरु करुन सन 2016-2017 या वित्तीय वर्षात पुर्ण करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसधारण विभाग, शासन परीपत्राक क्रमांक झेडपीए 2008 / प्र क्र 446 / वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार लाभार्थी निवड 31 मे अखेर करुन लाभार्थ्यास प्रत्यक्ष लाभ 30 नोव्हेंबर अखेर पर्यंत देणे आवश्यक होते. याकरीता सदरहु शासन परीपत्रकान्वये योजनेची अंमलबजावणी काटेकोरपणे विहीत कालावधीत पुर्ण व्हावी यासाठी वेळापत्रक आखुन देण्यात आलेले आहे. तथापि, त्यांचा सुयोग्य परीणाम झालेला दिसुन येत नाही. समर्थनीय खुलासा करावा. उदा साठा रजिस्टर वर वाटप दिनांक नाही. ठराव रजिस्टरमध्ये लाभार्थीची नावे नाहीत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 नियम 83 (3) व 87 अन्वये साहित्य खरेदी केल्यांनतर साहीत्याची गुणवत्ता व दर्ज्याची खात्री करणे आवश्यक आहे. याबाबत चाचणी अहवाल लेखापरीक्षणास पहावयास मिळाली नाही. नियमबाहयतेबाबत खुलासा करावा.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक / प रा स 1093/ प्र.क्र.1239, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थ्याची मास्टर रजिस्टर विहीत नमुन्यात ठेवण्यात न आल्यामुळे एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ देण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक प रा स/1084/ सी आर / 1622 /प्र क्र 197, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्स्याची रक्कम प्रथम वसुल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये, अशा स्प्ष्ट सुचना असतांना सदर योजनेच्या बाबतीत साहित्य वाटपाचे वेळेस लाभार्थी हिस्स्याची रक्कम वसुल करण्यात आली आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक प रा स/1096/ प्र.क्र. 178 / 05, दिनांक 09/10/1997 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहीत्य खरेदी केले, त्याच वित्तीय वर्षात साहित्याचे वाटप

व्हावयास पाहीजे, असे निर्देशीत केले आहे. तथापि, पंचायत समीतीकडील साठा पुस्तके पडताळणी केले असता पुढील आर्थीक वर्षात झाल्याचे आढळते. सर्व अर्ज दिनांक 20/04/2016 या दिनांकाचे अथवा त्यानंतरचे आहे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपीए 2009 / प्र.क्र. 514 / वित्त, दिनांक 20/11/2009 अन्वये जेव्हा कंत्राटात मांडललेली रक्कम किंवा मुल्य 10 लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल, त्या बाबतीत रूपये 100/- मुद्रांक शुल्क आकारावयाचे आहे व दहा लाख रुपयाच्या प्रत्येकी रूपये 1,00,000/- साठी किंवा त्याच्या भागासाठी रूपये 100 /- रुपये राहील असे असताना रूपये 15 लक्ष कामावर एकूण रूपये 1,100/- चे मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक असतांना रूपये 100/- बॉन्ड वर करारनामा केला. त्यामुळे रूपये 1,000/- शासन महसुलाचे नुकसान झाले. याची वसुली होणे आवश्यक आहे.

7) सदर एच डी पी ई पाईप वाटप करतांना ज्या शेतक-यांकडे जलसिंचनाचे साधन आहे. त्यांनाच सदर पाइप वाटप करणे आवश्यक आहे. परंतु, खालील निवडक लाभार्थ्यांचे अर्ज व सोबत जोडलेला सात बारा उतारा तपासला असता त्याचेकडे कोणतेच जलसिंचनाचे साधन उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांना वाटप करुन त्यांना कोणताच फायदा होणार नाही. त्यामुळे व योजनेचा उददेश सफल होणार नाही. त्याची संबधीतांकडुन वसुली होणे आवश्यक आहे.

**4.432 100 % अनुदानावर वैरण बियाणे / ठोंबे वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती हिंगणा, जिल्हा नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समितीने 2016-2017 मध्ये 100 टक्के अनुदानावर वैरण बियाणे / ठोंबे वाटप योजनेवर 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,99,925/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अतिरीक्त आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना आदेश क्रमांक ब 10(2)1813/-85201/पस-14पुणे, दिनांक 09/06/2015 अन्वये योजनेचा लाभ देण्यापुर्वी लाभार्थ्यांना योजनेची माहिती व पिकांच्या लागवडीबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक असतांना प्रशिक्षण देण्यात आलेले नाही.

2) अतिरीक्त आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना आदेश क्रमांक ब 10(2)1813/-85201/पस-14पुणे, दिनांक 09/06/2015 अन्वये योजने अंतर्गत लाभार्थ्यांना वैरण बियाणे (बरसिम व मका) प्राप्त झाल्याची पावती घेणे आवश्यक असतांना पावती घेण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1093/1239, दिनांक 01/09/1993 अन्वये तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1089/प्र.क्र./555 /34, दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थ्यांची प्रपत्र अ मध्ये नोंदवही ठेवुन दुबार लाभ प्रदान टाळण्याच्या दृष्टीने उपाययोजना केलेली नाही. शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे.

4) अतिरीक्त आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना आदेश क्रमांक ब 10(2)1813/-85201/पस-14पुणे, दिनांक 09/06/2015 अन्वये सदर कार्यक्रमासाठी प्रती लाभार्थी अनुदानाची मर्यादा रूपये 600/- असतांना वैरण बियाणे वाटप लाभार्थी यादीतील श्री. चंद्रकांत तिवारी, श्री. ईश्वर सोमणकर, श्री. जोगेश्वर कावळे, श्री. उरकुडा व-हाटकर, सौ.प्रभा घाटोळे, सौ. सुनिता व-हाटकर, श्रीमती उषा पाटील, श्री. रामदास हजारे, श्री. पुरुषोत्तम गोतमारे, यांना एकुण 1,450/- रुपयाचे जादा वैराण बियाण्याचे वाटप केलेले आहे. तरी संबधिताकडुन रक्कम रूपये 1,450/- वसुल करण्यात यावे.

**4.433 50% अनुदानावर बॅटरी चलीत स्प्रेपंप खरेदी योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती काटोल, जिल्हा नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,00,000/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक पंरास/1084/सीआर1647/97 दिनांक 19/09/1998 अन्वये लाभार्थी हिस्सा रक्कम प्राप्त झाल्याशिवाय साहित्य खरेदी करू नये, असे निर्देश आहे. तरी

सुध्दा साहित्य खरेदी करण्यात आले आहे. लाभार्थी हिस्सा दिनांक 02/06/2017 ला चलानद्वारे जमा करण्यात आले आहे.

2) लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता अनुक्रमांक 6 मंजुर यादीत जयराम प्रल्हादसिंह गहलोत लाडगांव परंतु, सातबारा उतारामध्ये सर्व क्रमांक 147/2 निरंजन प्रल्हादसिंह गहलोत या नावाने असतांना मंजुर लाभार्थाचे नावे सातबारा उतारा नसतांना नियमबाहय प्रदान केलेली अनुदानाची रक्कम रूपये 2,265/- वसुलपात्र ठरते.

3) अनुक्रमांक 34 सुरेंद्र श्रावणजी चरडे रा. काटोल खसारा क्रमांक 370/4 गांव काटोल शेती काटोल असुन वरील लाभार्थाची शेती व राहणारे शहरी भागातील असल्याने वरील योजना ग्रामीण भागातील शेतकऱ्याकरीता असल्याने नियमबाहय प्रदान केलेली अनुदानाची रक्कम रूपये 2,265/- वसुलपात्र ठरते.

4) पंचायत समिती सर्वसाधारण सभा दिनांक 19/12/2016 ला स्प्रे पंप वाटप योजना 44 लाभार्थीची यादी मंजुर करण्यात यावी, असे नमुद आहे. परंतू, लाभार्थीची यादीसह मंजुरी देण्यात आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1089/644 दिनांक 27/09/1989 अन्वये योजनेचे मुल्यमापन करणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात मुल्यमापन करण्यात न आल्याने योजना सफल झाली म्हणता येत नाही. तरी मुल्यमापन अहवालासह पुर्तता दर्शवावी.

### 4.434 50 % अनुदानावर शेतकऱ्यांना ताडपत्री पुरविणे

**पंचायत समिती पारशिवनी, जिल्हा नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समितीने 2016-2017 मध्ये 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना ताडपत्री पुरविणे या योजनेअंतर्गत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 3,57,852/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्रं-82/ भाग-III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 मधील नियम 3.1.1.2 अनुसार कार्यालयांनी कोणतीही खरेदी करण्यापूर्वी प्रशासकिय आदेश काढल्यानंतर खरेदी प्रक्रिया अवलंबविण्यात यावी. तसेच प्रशासकिय आदेशातच खरेदीची आवश्यकता व खरेदी केलेल्या वस्तूंचा विनीयोग तातडीने केला जाणार आहे, असे प्रमाणित करण्यात यावे. तथापि, या नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्रं-82/ भाग-III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 मधील नियम 2.9.3 अनुसार कार्यालयांनी खरेदी समिती स्थापन करणे आवश्यंक आहे व रुपये 3 लाखावरील खरेदीस उक्तं समितीचे मंजूरी घेणे आवश्यक आहे. तथापि, वरील प्रकरणी सदरील समितीची मान्यता न घेतल्यामुळे सदर नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक पंरास/1082, दिनांक 29/06/1989 अन्वये राबविलेल्या योजनेचे मुल्यमापन करणेबाबत निर्देश असतांना, मुल्यमापन अहवाल नस्तीबध्द नाही.

4) पंचायत समितीने समितीचे ठराव क्रमांक 2 दिनांक 13/07/2016 रोजी लाभार्थी यादीस मंजूरी दिलेली आहे. लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता, काही अर्ज लाभार्थी यादीस मंजूरी दिल्यानंतरचे दिसून येतात. तसेच लाभार्थी अर्ज प्राप्तीबाबत पंचायत समितीतर्फे अर्ज प्राप्तीचा दिनांक अर्जावार नमुद करण्यात येत नाही.

### 4.435 जलपुर्ती योजनेअंतर्गत केलेल्या धडक सिंचन विहीरी बांधकामाबाबत

**पंचायत समिती वर्धा, जिल्हा वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 21) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 43, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रूपये 2,47,894/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने प्रदान केल्याबाबत- सदर कामाच्या अंतिम मोजमापाप्रमाणे बाब क्रमांक 5 Excavation in Hard murum च्या कामाकरीता अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने रक्कम प्रदान केलेली आहे. अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने प्रदान केलेली रक्कम रूपये 9,015/- वसुल करुन शासन खाती जमा करावे.

2) कामाच्या प्रगतीनुसार कामाचे मोजमाप घेणे व दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक असतांना कामाचे एकत्रित मोजमाप घेतले आहे.

3) सिंचन विहीर बांधकामाचे अंदाजपत्राकानुसार 15 मीटर उंचीची विहीरीकरीता रूपये 2,50,000/- प्राकलन तयार केलेले असुन प्रत्यक्ष 12 मीटर उंचीची विहीरीकरीता तेवढाच खर्च केलेला आहे. तरी याबाबत खुलासा करावा.

**4.436 ओटिएसपी योजने अंतर्गत 100 टक्के अनुदानावर बैलजोडी, सिंचन विहीर करिता लाभार्थी निवड व वाटपा मधील अनियमितता बाबत.**

**पंचायत समिती आर्वी, जिल्हा वर्धा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** ओटिएसपी योजने अंतर्गत सन 2016-2017 या आर्थीक वर्षात 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 5,37,186/- खर्च करण्यात येऊन लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) निवड अंतिम करतांना महिलांना 30 टक्के लाभ व अपंगाना 3 टक्के लाभ दिल्याचे दिसुन आले नाही. अर्ज प्राप्तीसाठी प्रचार व प्रसिध्दी पुरेशा प्रमाणात केल्याचे दिसुन आले नाही.

2) योजनेचे मूल्यमापन त्रयस्थ यंत्रणेकडून करणे आवश्यक आहे. मूल्यमापन त्रयस्थ यंत्रणेकडून केल्याबाबतचे अभिलेखे आढळून आले नाही.

3) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे जिल्हा कृषी अधिकारी, गट विकास अधिकारी यांनी विहित प्रमाणात लाभार्थ्यांची तपासणी केली नसल्याचे दिसुन येते.

4) सदर योजना अंतर्गत निवड झालेल्या व्यक्ती या अल्प उत्पन्न गटातील असल्याबाबत घेण्यात आलेले त्यांचे दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र सन 2016-2017 वा लगत पुर्वीच्या वर्षाचे नसुन 5 ते 6 वर्षाचे असल्याने या 5 ते 6 वर्षात संबंधितांच्या उत्पन्ना मध्ये वाढ झाली किंवा कसे, याबाबत तपासणी होउन अद्यावत उत्पन्नाचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

5) ज्या ज्या लाभार्थींना योजनेअंतर्गत बैलजोडीचा लाभ म्हणजेच प्रत्येकी रक्कम रुपये 30,000/- चा लाभ देण्यांत आला आहे.

अ) विक्री केल्याचे दर्शविलेली जनावरे ही विक्री करणा-या इसमाच्याच मालकीची असल्याबाबत आवश्यक अभिलेखे जसे, संबंधित पोलीस पाटील, पोलीस स्टेशनचे प्रमाणपत्र.

ब) खरेदी - विक्रीबाबत स्टॅम पेपरवरील करारनामा; विक्री करणा-यास विक्रीच्या दिनांकास प्रत्यक्ष मिळालेली रक्कम किती?

क) ज्या लाभार्थीने बैलजोडी खरेदी केली, त्या लाभार्थीने ती जनावरे प्रत्यक्षात प्राप्त / हस्तांतरण झाल्याचे व त्या लाभार्थीने ती त्यांच्या गावी नेल्याबाबत संबंधित पोलीस पाटील, सरपंच व पशुगणना अधिकारी यांचे प्रमाणपत्र नाही.

6) संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचना जा.क्र.विप्र-7/आउयो/मासु/16-17/432/16 दिनांक 19/08/2016 नुसार विविध सक्षम अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या लाभांची विशिष्ट प्रमाणात तपासणी होणे आवश्यक आहे. मात्र सन 2015-2016 व सन 2016-2017 मध्ये दिल्या गेलेल्या लाभांबाबत तशी तपासणी करुन लाभार्थी योजनेचा वापराबाबत उपयोगीता प्रमाणपत्र पहावयास मिळालेले नाही. त्यामुळे योजनेअंतर्गत केलेल्या खर्चाचा वापर योग्य त्या लाभार्थीकरीता केल्याचे व लाभार्थी त्याचा सदुपयोग करीत आहे किंवा त्याने अनुदानाअंतर्गत मिळालेली साधने, पशुधन यांची विक्री तर केली नाही, यांची खात्री करता येत नाही.

7) दारिद्रय रेषेखालील शेतक-याचे उत्पन्न आढवुन त्यांना दारिद्रय रेषेच्यावर आणण्याकरीता सदरची योजना केंद्र शासन व राज्य शासन राबवित आहेत. परंतु, लाभार्थीपैकी किती शेतकरी दारिद्रय रेषेच्यावर जीवन जगत आहेत? याची माहिती उपलब्ध न झाल्यामुळे योजनेमधील शासनाचा उदेश सफल झाल्याबाबत सत्यता पडताळता आली नाही.

8) बैलजोडी वाटप करतांना मौका तपासणी अहवाल आवश्यक असतांना नस्ती आढळून आले नाही.

**4.437 राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम योजनेवरील नियमबाहय खर्चाबाबत.**

**पंचायत समिती हिंगणघाट, जिल्हा वर्धा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** अभिकरण निधीतुन केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रमांतर्गत बायोगॅस संयंत्र बांधकाम करणे या योजनेकरीता 2 प्रमाणकाद्वारे रक्कम रुपये 5,97,000/- खर्च करण्यात आला आहे.

नस्ती व लाभार्थींचे अर्ज तपासले असता यात पुढीलप्रमाणे नियमबाहयता आढळुन आल्या.

1) मे.कमलनयन जमनालाल बजाज फाउंडेशन, वर्धा यांनी त्यांचे पत्र क्रमांक 124/2016-17 दिनांक 27/03/2017 व पत्र क्रमांक 136 दिनांक 29/03/2017 अन्वये अनुक्रमे 28 व 22 एकुण 50 संयत्रांचे बांधकाम पुर्ण झाल्याबाबतचे एकुण रूपये 4,50,000/- चे देयक पंचायत समितीला सादर केले असतांना पंचायत समितीने 65 संयत्रांचे रूपये 5,85,000/- चे शोधन केले आहे. रूपये 5,85,000/- च्या देयकाची मागणी केलेली नसतांना जादा रक्कम रूपये 1,35,000/- शोधन करणे नियमबाहय असुन वसुलपात्र आहे. तसेच 3 एससी लाभार्थींचे वाढीव अनुदान रूपये 6,000/- सुध्दा संयंत्र बांधकाम झाले नसतांना शोधन केले आहे

2) लाभार्थ्यां जवळ आवश्यक पशुधन (जनावरे) असल्याबाबत त्या भागातील पशुधन पर्यवेक्षक / पशुधन विकास अधिकारी यांचा अहवाल नाही.

3) लाभार्थ्यांना प्रशिक्षण दिल्याबाबत नस्तीत नमुद नाही.

4) लाभार्थ्यांची निवड कोणी केली? किती अर्ज प्राप्त त्यापैकी वैध/अवैध किती? याची माहीती नस्तीमध्ये नमुद नाही.

5) लाभार्थी निवड ही ग्रामसभेतुन करावयाची असतांना अर्जावर ग्रामसभेचा ठराव क्रमांक व दिनांक नमुद नाही.

**4.438 अत्यल्प, अल्पभुधारक व इतर गरजु शेतकऱ्यांना 75 टक्के अनुदानावर स्प्रे पंप पुरवठाबाबत**

**पंचायत समिती देवळी, जिल्हा वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 4 दिनांक 08/09/2016 अन्वये रक्कम रपये 1,37,936/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक 1089/सीआर/418/34, दिनांक 14/09/1989 नुसार प्रथम लाभार्थ्याचे सर्वेक्षण करुन लाभार्थी यादी निश्चित करुन साहित्य खरेदी करणे अवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही. योजनेस पंचायत समिती सर्वसाधारण सभेची मंजुरी ठराव विषय क्रमांक 5 दिनांक 22/07/2016 नुसार घेतली आहे. परंतु, लाभार्थी निवडीस सर्व सभेची मंजुरी घेतलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास-1084/सीआर/1633 दिनांक 19/01/1985 चे निर्देशानुसार योजना राबविण्यापुर्वी लाभार्थी हिस्सा वसुल करणे आवश्यक असतांना लाभार्थी हिस्सा पुरवठा आदेशाच्या दिनांका नंतर वसुल करण्यात आला.

3) लाभार्थ्याच्या निवडक अर्जाची पडताळणी केली असता त्यामध्ये लाभार्थ्याच्या अर्जावर कार्यालयाचा आवक क्रमांक व दिनांक नमुद नाही. तसेच अर्जासोबत उत्पनाचे दाखले, ग्रामसेवकाचे शिफारस पत्र, ग्रामसभेद्वारे लाभार्थीची निवड केल्याचा उल्लेख नसणे, तसेच लाभार्थी अर्ज परिपुर्ण नसतांना त्यांची निवड कशाचे आधारे केली? याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. ज्या वर्षात अनुदान प्राप्त झाले, त्याच वर्षात लाभार्थ्यांना लाभ देणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही लाभार्थ्यांच्या अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रावरुन दिसुन येत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83 (3) नुसार खरेदी केलेले साहित्य चांगल्या दर्जाचे व नमुद आकारमानाचे असल्याबाबत चाचणी अहवाल लेखापरीक्षणास सादर करण्यांत आला नाही.

5) नॅपसॅक स्प्रेपंप कोणास विकणार नाही. गहाण ठेवणार नाही. या विषयी 20/- रुपयाचे स्टॅम्प पेपवर रीतसर करारनामे करुन घेणे आवश्यक असतांना करारनामे करुन घेण्यांत आले नाही. त्यामुळे नॅपसॅक स्प्रेपंप वापर स्वत: लाभार्थी करत असलेबाबत खात्री करता आलेली नाही.

6) नॅपसॅक स्प्रेपंप वाटपाची योजना ही, जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाव्यतिरिक्त समाजकल्याण विभागाकडुनसुध्दा राबविण्यांत येते. त्यामुळे संबंधित लाभार्थीची याच योजनेचा दुबार लाभ होऊ नये, म्हणुन त्यांचेकडुन त्या त्या विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना, तसे प्रमाणपत्र घेतले नाही. त्यामुळे संबधित लाभार्थीस याच योजनेचा दुबार लाभ दिल्याबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक आखंस/1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 प्रमाणे लाभार्थीचे गावनिहाय मास्टर रजिस्टर ठेवलेले नाही. त्यामुळे लाभार्थींना दुबार लाभ दिल्याची पडताळणी करता आली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1089/606/266/ 34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचे मुल्यमापन करुन फलश्रुतीविषय अहवाल तयार करणे आवश्यक असतांना अशाप्रकारे कार्यवाही झाल्याने दिसुन येत नाही. त्यामुळे योजनेचा उददे्श सफल झाल्याबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे.

**4.439 जलपुर्ती सिंचन विहीर अंतर्गत केलेल्या विहीर बांधकामाबाबत.**

**पंचायत समिती देवळी, जिल्हा वर्धा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रपये 2,01,66,835/- खर्च करण्यात आला आहे. जलपुर्ती सिंचन विहीर (रोजगार हमी योजना) अंतर्गत 2009 मध्ये लाभ न मिळालेल्या लाभार्थ्याना पुन्हा शासन निर्णयानुसार विहीरीचे लाभ देण्याकरीता 102 लाभार्थ्याची निवड केली होती व एकत्रित प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजेनेच्या अंमलबजावणीकरीता अनुदान प्राप्त असुन सुध्दा 102 लाभार्थ्यापैकी किती लाभार्थ्याकडुन करारनामा केला आहे व किती विहीरीचे काम सुरु आहे? याबाबत माहिती आढळली नाही. तसेच सदर योजनेअंतर्गत विहीरी पुर्ण करण्यास दिनांक 30/06/2016 पर्यत मुदत होती व नंतर नियोजन विभागाच्या दिनांक 25/10/2016 च्या शासन निर्णयानुसार विहीरी पुर्ण करणेची मर्यादा दिनांक 30/06/2017 पर्यंत मुदतवाढ दिली होती व कोणत्याही परिस्थितीत दिनांक 30/06/2017 पर्यत पुर्ण होणे बंधनकारक राहील, असे निर्देशित केले होते. शासन निर्णयानुसार सर्व विहीरीचे काम दिनांक 30/06/2017 पर्यत पुर्ण करणे आवश्यक होते. परंतु, पंचायत समितीने सर्व विहीरीचे बांधकाम पुर्ण करणेबाबत प्रभावी अंमलबजावणी केली नसल्यांने विहीरीचे बांधकाम मंद गतीने सुरु असल्याचे दिसुन येत. त्यामुळे शासनांचे जलपुर्ती निधीमध्ये मार्च 2017 अखेर रूपये 2,01,66,835/- अखर्चित आहे व शासनांची रक्कम नाहक गुंतवुन आहे.

2) पंचायत समितीने सादर केलेल्या विवरणपत्रात एकुण 11 विहीरीचे काम पुर्ण झाल्याचे दर्शविले आहे व त्या संबंधी नस्ती, प्राकलन व मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास सादर केलेले आहे. परंतु, या 11 विहीरीचे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर केलेली नाही.

3) विवरणपत्रानुसार 11 लाभार्थ्याचे विहीरीचे काम पुर्ण झाले आहे. जलपुर्ती निधीचे प्रमाणक क्रमांक 68 दिनांक 04/03/2017 रक्कम रूपये 64,350/- (व्दितीय व अंतिम देयक) ची तपासणी केली असता, श्री. विजय श्यामराव चकोले या लाभार्थ्याला उपरोक्त प्रमाणकानुसार अंतिम रूपये 64,350/- प्रदान केले आहे व प्रमाणकासोबत काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र जोडले आहे. त्यानुसार या विहीरीचे बांधकाम दिनांक 01/02/2017 ला पुर्ण झाले आहे. परंतु, पंचायत समितीने सादर केलेल्या पुर्ण झालेल्या 11 विहीरीचे यादीमध्ये या लाभार्थ्याचे नांव नाही व या विहीरीसंबंधी प्राकलन, नस्ती व मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षण सादर केलेली नाही. म्हणजेच पंचायत समितीकडे विहीरीसंबंधी अद्यावत माहिती नाही.

4) मुळ धडक सिंचन विहीर योजना 1 लक्ष रूपये ची होती. परंतु, त्यावेळेच लाभ न घेतलेल्या लाभार्थ्यांना नव्याने 2.50 लक्ष मर्यादेत विहीरीकरीता लाभ देण्यात येत आहे. निवड 102 लाभार्थ्याचे नव्याने योजनेचा लाभ घेण्यास तयार असल्याबाबतचे संमती पत्र विभागाने लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

5) उपरोक्तप्रमाणे पुर्ण झालेल्या विहीरीचे मोजमाप पुस्तिका तपासणी केली असता, कामांच्या प्रगतीनुसार कामांचे मोजमाप घेणे आवश्यक असतांना एकत्रित मोजमाप घेतल्यांचे दिसुन येते. तसेच मोजमाप पुस्तिकेवर कधी

मोजमाप घेतले आहे त्या दिनांकाची नोंद घेणे आवश्यक असतांना व दिनांकीत स्वाक्षरी घेणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**4.440 आदीवासी क्षेत्राबाहेरील आदीवासी उपयोजना अंतर्गत बैलजोडी खरेदी व विहिरी बांधकाम खर्चाबाबत**

**पंचायत समिती सेलू, जिल्हा वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 43) -** सदरबाबत 14 प्रमाणकान्वये एकुण 20 लाभार्थी बैलजोडी खरेदी करण्यासाठी रक्कम रुपये 7,36,147/- खर्च करण्यात आला आहे.

तसेच एकुण 02 सिंचन विहिर लाभार्थीचे पहिले धावते देयक मंजुर करण्यात आले आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मार्गदर्शक सुचना क्रमांक विप्र-7/आउयो/मासु/16-17/432/2016, दिनांक 19/08/2016 मधील अट क्रमांक 5 अन्वये सदर योजनेची प्रसिध्दी व्यापक स्तरावर देऊन शेतकरी बांधवांना माहिती झाली पाहिजे. याबाबत तरतुद असुन त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही

2) उपरोक्त मार्गदर्शक सुचनामधील अट क्रमांक 6.2 अन्वये सदर योजनेचा मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणेकडून करुन घेणे आवश्यक आहे. याबाबत कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

3) मार्गदर्शक सुचना क्रमांक विप्र-7/आउयो/मासु/16-17/432/2016, दिनांक 19/08/2016 मधील अट क्रमांक 6.6 अन्वये एकुण लाभार्थीपैकी 03 टक्के लाभार्थी आदीवासी शेतकरी असणे आवश्यक असतांना, त्याप्रमाणे त्यांना लाभ देण्यात आल्याचे दिसुन येत नाही.

4) आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना अंतर्गत बैलजोडीचे लाभार्थी श्री अंबादास ऊईके  यांच्या अर्जामध्ये ग्रामसभेच्या ठरावाबाबत प्रमाणपत्रामध्ये खाडाखोड दिसुन येते. याबाबत कारणमिमांसा होणे आवश्यक आहे.

5) सिंचन विहिर बांधकामामध्ये Dewatering चे मोटर पंप लॉगबुक सादर करण्यात आलेले नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1089/646/366/34, दिनांक 29/07/1989 अन्वये आदिवासी शेतक-यांचे कृषी उत्पादन वाढीस सहाय्य करुन त्यांच्या आर्थिक उन्नतीस मदत करणे हा असुन राबविलेल्या योजनेचे मुल्यमापन करणे आवश्यक असतांना मुल्यमापन न केल्याने योजनेचा उद्देश सफल झाला, असे म्हणता येत नाही.

**4.441 विशेष घटक योजना अंतर्गत 100 टक्के अनुदानावर बैलजोडीकरीता लाभार्थी निवड, बैलजोडी खरेदी व वाटपामधील अनियमितता बाबत.**

**पंचायत समिती कारंजा, जिल्हा वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 35) -** पंचायत समिती, कारंजा येथील सन 2016-2017 मध्ये विशेष घटक योजना अंतर्गत 100 टक्के अनुदानावर बैलजोडीकरीता लाभ दयावयाच्या 18 लाभार्थीची निवड यादी तयार करुन प्रती लाभार्थी रक्कम रुपये 30,000/- प्रमाणे लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी रक्कम रुपये 30,000/- प्रमाणे रक्कम रुपये 5,40,000/- किंमतीचे बैलजोडीची खरेदी करुन वाटप करण्यांत आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचना जा.क्र.विप्र-7/विघयो/मासु/16-17/451/2016, दिनांक 25/08/2016 परिशिष्ठ - (दोन) (अ) 4.2 नुसार अर्जासोबत सबंधीत शेतक-याकडे सध्या बैलजोडी नसल्याचे पशुवैदयकिय अधिका-याचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले नाही.

2) प्रशासकीय / तांत्रिक मान्यता आदेश सादर नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक:झेपीए-008, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेने राबविण्यांत येणा-या विविध योजनाचे नियोजन व अंमलबजावणी नुसार महिलांना 30 टक्के लाभ व अपंगाना 3 टक्के लाभ दिल्याचे दिसुन आले नाही.

4) निवड झालेल्या 18 लाभार्थीना सन 2016-2017 या आर्थिक वर्षात लाभ देण्यांत आला आहे. संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचना जा.क्र.विप्र-7/

विघयो/मासु/16-17/451/16, दिनांक 25/08/2016 च्या परीच्छेद क्रमांक 2.1 अन्वये 2 हेक्टर पर्यंत क्षेत्र असलेल्या शेतक-यांना प्रथम लाभ देणे आवश्यक असतांना त्याना प्राथम्याने लाभ न देता त्यापेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या अनेक लाभार्थींना लाभ देण्यांत आला आहे.

5) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे जिल्हा कृषी अधिकारी गट विकास अधिकारी यांनी विहित प्रमाणात लाभार्थ्यांची तपासणी केललेी नसल्याचे दिसुन येते.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय आखंस/1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 प्रमाणे लाभार्थीचे गावनिहाय मास्टर रजिस्टर ठेवलेले नाही. त्यामुळे लाभार्थींना दुबार लाभ दिल्याची पडताळणी करता आली नाही.

7) संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचना जा.क्र.विप्र-7/विघयो/मासु/16-17/451/2016 दिनांक 25/08/2016 नुसार विविध सक्षम अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या लाभांची विशिष्ट प्रमाणात तपासणी होणे आवश्यक आहे. मात्र सन 2016-2017 मध्ये दिल्या गेलेल्या लाभांबाबत तशी तपासणी करुन लाभार्थी योजनेचा वापराबाबत उपयोगीता प्रमाणपत्र पहावयास मिळालेले नाही. त्यामुळे योजने अंतर्गत केलेल्या खर्चाचा वापर योग्य त्या लाभार्थीकरीता केल्याचे व लाभार्थी त्याचा सदुपयोग करीत आहे किंवा त्याने अनुदानाअंतर्गत मिळालेली साधने, पशुधन यांची विक्री तर केली नाही, यांची खात्री प्रमाणपत्राअभावी करता येत नाही.

**4.442 बायोगॅस संयत्र बांधकाम केलेल्यालाभार्थ्यास प्रोत्साहन अनुदान वाटपाबाबत.**

**पंचायत समिती पवनी, जिल्हा भंडारा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत रक्कम रूपये 52,500/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थ्यांची निवड यादी तसेच अनुदान रक्कम प्रदान यादी नस्तीत उपलब्ध नाही

2) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डिसीटी 2316/प्र.क्र.133/का-1417, दिनांक 05/12/2016 अन्वये अनुदानाची रक्कम थेट लाभार्थीचे बँक खात्यात जमा करण्याचे शासनाचे आदेश असतांना संबंधीत ग्रामपंचायतींना प्रदान केले आहे.

3) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पवनी यांचे पत्र क्रमांक पंसप/बायोगॅस/1242/2017, दिनांक 26/04/2017 अन्वये ग्रामपंचायत सचिव व संबंधीत लाभार्थीचे संयुक्त सहिने सदर अनुदान प्राप्त झालेबाबत पोचपावती प्राप्त केली नाही. महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 20 अन्वये पोच प्राप्त करणे आवश्यक आहे.

4) प्राप्त अनुदानाचे वापर बायोगॅस बांधकामाचे प्रयोजनार्थ केल्याबाबत लाभार्थी व संबंधीत ग्रामपंचायत सचिवाकडुन उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले नाही.

5) बायोगॅस संयत्र बांधकाम टाईपप्लॅन रकमेनुसार शासनाकडुन अनुदान प्राप्त होत असल्याचे पुन्हा सेसे निधी मधुन प्रोत्साहन अनुदान वाटप करणे म्हणजे निधीचे नुकसान करणे आहे.

**4.443 आदिवासी क्षेत्राबाहेरील शेतक-यांना 100**टक्के**अनुदानावर बैलगाडी पुरविणे बाबत(O.T.S.P.)**

**पंचायत समिती सालेकसा, जिल्हा गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,04,186/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नस्तीची तपासणी केली असता योजना राबविण्यापूर्वी प्रशासकीय तथा तांत्रिक मंजुरी घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्यामूळे योजनेवर खर्च् करावयाची रक्कम ही प्रशासकीय मुल्याचा तुलनेत कमी किंवा अधिक याबाबत निश्चित असा अभिप्राय देता येत नाही.

2) शाखा व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उधोग विकास महा मंडळ नागपूर यांचे मुळ इन्वाईस क्रमांक 708(B) दिनांक 31/03/2017 असून त्याच पुरवठा धारकांचे दुसरेच इन्वाईंस क्रमांक 809 दिनांक 31/03/2017 मध्ये

आस्थापनेवर देयक पारीत करण्यात आले आहे. इन्वाईस मधील क्रमांकामध्ये असलेल्या फरकाबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) देयकास संलग्न खर्च मंजुरी आदेशमध्ये केवळ साहित्याची मुळ मुल्याची रक्कम 99,225/- असतांना स्वतंत्ररित्या देयकामध्ये 5टक्के अभिकरण शुल्काची रक्कम रूपये 4,961/- + करून देयक पारीत केल्यामूळे अभिकरण शुल्काची रक्कम रुपये 4,961/- तात्पुती आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

4) साहित्य पुरवठा आदेश नस्तीला आढळून येत नाही.

5) सदर योजनेचा लाभ हा 7 लाभार्थी यांना देण्यात आले असून एकही लाभार्थी यांचे अर्ज, शेती संबंधीचा 7/12, उत्पन्न दाखला, आधार कार्ड, रहिवास दाखला, जाती संबंधीचा दाखला वगैरे दस्ताऐवज नस्तीला आढळून येत नाही.

6) खरेदी साहीत्याची स्पेशिफीकेशनप्रमाणे तपासणी करून तपासणी अहवाल सादर केलेला नाही.

7) लाभार्थी यांचेकडून रूपये 100/- च्या स्टॅम पेपरवर करारनामा करावयाचे असतांना करारनामा करण्यात आलेला नाही.

8) साहित्याची पोच पावतीमध्ये साहित्य प्रत्यक्षात केव्हा प्राप्त् झाले? त्याबाबतचा दिनांक नमूद करण्यात आलेला नाही.

9) लाभ दिलेल्या लाभार्थी माहिती मस्टरनोंदवही मध्ये ठेवण्यात आली नाही. त्यामूळे एकाच लाभार्थीस दुबारा लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

10) उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यात आले नाही.

**4.444 विशेष घटक योजना अंतर्गत बैलजोडी खरेदी अनुदान लाभार्थी शेतकऱ्यांना वाटप करणेबाबतची अनियमितता.**

**पंचायत समिती देवरी, जिल्हा गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 60,79,500/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2016/प्र.क्र.. 301/11-अे, दिनांक 21/01/2017 मधील मुद्दा क्रमांक 3(ई) अर्जदार शेतकऱ्याने त्यांचे बँकेचे खाते आधार क्रमांकाशी जोडून घेणे आवश्यक राहील आणि त्याकरिता त्यांनी बँकेला दिलेल्या पत्राची बँकेकडून मिळालेली पोहोच पावती प्रत स्वयंसाक्षांकित करुन सादर करणे आवश्यक आहे. परंतु, सादर केलेल्या दस्ताऐवजात फक्त शेतकऱ्याचे बँक खाते क्रमांक घेण्यात आल्याचे दिसून येत आहे. तरी सदरचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडण्यात आल्याचे नोंदविण्यात आलेले नाही.

2) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शक सूचना जा.क्र. विप्र-7/विघयो व आउयो/अंतरिम मासु/14-15/459 व 460/14 दिनांक 31/05/2014 व दिनांक 02/06/2014 अन्वये मुद्दा क्रमांक 3 नुसार “प्रथम प्राप्त प्रथम प्राधान्य” तत्वानुसार लाभार्थी निवड आवश्यक आहे. मुद्दा क्रमांक 6.6 नुसार एकूण मंजूर निधीपैकी 3 टक्के निधी अनूसूचित जातीतील/ आदिवासी अंपग शेतकऱ्यासाठी राखून ठेवावा. असे लाभार्थी प्रयत्न करूनही उपलब्ध झाले नाहीत, तर त्याबाबत आवश्यक अभिलेख संग्रहीत ठेऊन अनुसूचित जातीच्या/ इतर आदिवासी शेतकऱ्यांना लाभ देता येईल असे नमुद केले आहे. परंतु, तशी कार्यवाही करण्यात आल्याचे दस्ताऐवज सादर केले नाही. तसेच एकूण लाभार्थी शेतकऱ्यांमध्ये 30 टक्के महिला असणे आवश्यक आहे.

3) सदर योजनेत अनुदानातून अभिकरण शुल्क सरसकट 5 टक्के कपात करण्यात आल्याचे निदर्शनास येते. शासन निर्णयाच्या अनुषंगाने तरतुदीतून 4 टक्के रक्कम कपात करण्यात आल्यानंतर, उर्वरीत 1 टक्का लेखापरिक्षण केल्यानंतर कपातीकरिता नियंत्रक अधिकाऱ्यांमार्फत खर्चाच्यानुसार मागणी करणे आवश्यक असून शिल्लक रक्कम जमा करण्यात यावे, असे नमुद केले आहे. तसे न करता सदर शेतकरी लाभार्थ्यांना अनुदान वाटप करतांना 1 टक्के जादा कपात केल्याने लाभार्थ्यांना अनुदान स्वरुपात लाभ प्राप्त करता आलेला नाही. तसेच सदर अभिकरण

शुल्कांची 1 टक्के जादा कपात करुन जिल्हा परिषदकडे उत्पन्न म्हणून जमा करण्यात आलेली आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेकडे अभिकरण शुल्कापोटी 1 टक्के जादा उत्पन्न नोंदविण्यात आल्याचे निष्पन्न होते. तरी नियंत्रक अधिकाऱ्यामार्फत 1 टक्के अभिकरण शुल्क रुपये 57,900/- ची मागणी न करता सरसकट जादा कपात करणेबाबत कारणमिमांसा होणे आवश्यक आहे.

4) प्रमाणक क्रमांक 104, दिनांक 30/03/2017 अन्वये मंजुर लाभार्थी श्री. प्रदिप बालाराम टेंभुरकर, रा. पांढरवानी यांना बैलजोडी खरेदीचा लाभ मंजुर आहे. परंतु, कृषी उत्पन्न बाजार समिती, देवरी यांचे मवेशी विक्री पा.क्र. 327, दिनांक 08/03/2017 नुसार खरेदीदार म्हणून श्री. प्रदिप रामचंद्र टेंभुरकर असून विमा श्री रमेश रामचंद टेंभुरकर, रा. पांढरवानी यांचे नावे देण्यात आलेला आहे. त्याबाबत संबंधितास अर्धसमास पत्र क्रमांक क्यु. 3, दिनांक 29/08/2017 अन्वये विचारणा केली असता लेखापरिक्षण कालावधीत समाधानकारक उत्तर देण्यात आले नाही.

5) एकाच कुटुंबातील (1) श्री शामराव जैराम अंबरवाडे, रा. कडीकसा (3) श्री दादुराम जैराम अंबरवाडे, रा. कडीकसा (3) श्री भिमराव जैराम अंबरवाडे, रा. कडीकसा याप्रमाणे तीन लाभार्थी शेतकऱ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. त्याबाबत संबंधितास अर्धसमास पत्र क्रमांक क्यु. 3, दिनांक 29/08/2017 अन्वये विचारणा केली असता लेखापरिक्षण कालावधीत समाधानकारक उत्तर देण्यात आले नाही. त्यामुळे सदर तीन लाभार्थी शेतकऱ्यांना प्रदान केलेल्या बैलजोडीचे अनुदानापैकी दोन लाभार्थ्यांचे अनुदान एकूण रुपये 60,000/- देय ठरत नाही.

6) लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदान वाटप करण्यात आल्यानंतर, त्यांचेकडून खरेदी बिले व बैलजोडीचा विमा काढण्यात आल्याचे दस्ताऐवज सादर करण्यात आले नाही. 10 लाभार्थ्यांना बैलजोडीचा लाभ देण्यात आला आहे. त्यांची जिल्हा परिषदकडून मंजुरी केलेली लाभार्थी यादी सादर केली नाही.

7) शासन निर्णय क्र. आऊयो 2415/प्र.क्र. 243/4 अे, दिनांक 16 जुलै 2016 चे परिशिष्ट 2 मधील योजना क्र. 4 प्रमाणे बैलजोडीची खरेदी नियमित जनावरांच्या बाजारात लाभार्थ्यांच्या संमतीनुसार, पशुवैदयकीय अधिकारी, कृषी अधिकारी (विघयो), जिल्हा परिषद व कृषि अधिकारी (विघयो) यांच्या उपस्थितीत करण्यात आल्याचे दस्ताऐवज लेखापरिक्षण कालावधीत सादर करण्यात आले नाही.

8) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- मागास 1089/प्र.क्र.565/34, दिनांक

05/10/1989 तथा दिनांक 02/09/1993 अन्वये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतू, ती लेखापरिक्षण कालावधीत संपुर्ण नोंदीसह सादर करण्यात न आल्याने एकाच व्यक्तीस दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

9) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शक सूचना जा.क्र. विप्र-7/विघयो व आउयो/अंतरिम मासु/14-15/459 व 460/14, दिनांक 31/05/2014 व दिनांक 02/06/2014 अन्वये मुद्दा क्रमांक 14 नुसार योजनेची तपासणीची टक्केवारी देण्यात आली असून, त्याप्रमाणे विभागीय कृषी सहसंचालक, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) व कृषी अधिकारी (विघयो) पंचायत समिती स्तर यांचेकडून तपासणी करण्याचे निर्देश दिलेले आहे. परंतु, त्यानुसार कार्यवाही करण्यात आल्याचे दस्ताऐवज सादर करण्यात आले नाही.

**4.445 अनुसुचित जाती SCP आदिवासी उपयोजना TSP आदिवासी क्षेत्राबाहेरील लाभार्थींना बैलजोडी करीता अर्थसहाय्य मधील अनियमितता.**

**पंचायत समिती गडचिरोली, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** अनुसुचित जाती SCP आदिवासी उपयोजना TSP आदिवासी क्षेत्राबाहेरील लाभार्थींना बैलजोडीकरीता रक्कम रूपये 45,90,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचना जा.क्र.विप्र-7/मासु/16-17/432/2016, दिनांक 19/08/2016 परिशिष्ठ - (दोन) (अ) 4.2 नुसार लाभार्थी अर्जासोबत सबंधीत शेतक-याकडे सध्या बैलजोडी नसल्याचे पशु वैदयकिय अधिका-याचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेपीए-008, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेने राबविण्यांत येणा-या विविध योजनाचे नियोजन व अंमलबजावणी नुसार महिलांना 30 टक्के लाभ व अपंगाना 3 टक्के लाभ दिल्याचे दिसुन आले नाही.

3) बैलजोडी खरेदीची नोंद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 93 नुसार Live Stock Register Form No. 35 मध्ये जनावराचे वर्णन तपशीलासह घेणे आवश्यक आहे. परंतू, त्याचे पालन केलेले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आखंस/1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 प्रमाणे लाभार्थीचे गावनिहाय मास्टर रजिस्टर ठेवलेले नाही. त्यामुळे लाभार्थींना दुबार लाभ दिल्याची पडताळणी करता आली नाही.

5) संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचना जा.क्र.विप्र-7/ओटीएसपी/मासु/16-17/432/2016, दिनांक 19/08/2016 नुसार विविध सक्षम अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या लाभांची विशिष्ट प्रमाणात तपासणी होणे आवश्यक आहे. मात्र सन 2016-2017 मध्ये दिल्या गेलेल्या लाभांबाबत तशी तपासणी करुन लाभार्थी योजनेचा वापराबाबत उपयोगीता प्रमाणपत्र पहावयास मिळालेले नाही. त्यामुळे योजने अंतर्गत केलेल्या खर्चाचा वापर योग्य त्या लाभार्थी करीता केल्याचे व लाभार्थी त्याचा सदुपयोग करीत आहे किंवा त्याने अनुदानाअंतर्गत मिळालेली साधने, पशुधन यांची विक्री तर केली नाही, यांची खात्री प्रमाणपत्रा अभावी करता येत नाही.

**4.446 आदिवासी उपयोजना अंतर्गत लाभार्थ्यांना बैलजोडीचा लाभ देणेबाबत.**

**पंचायत समिती कुरखेडा, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** आदिवासी उपयोजना अंतर्गत लाभार्थ्यांना बैलजोडीचा लाभ देणेबाबत रक्कम रूपये 39,30,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर वित्तीय वर्षात निवड केलेल्या आदिवासी उपयोजना (टि.एस.पी.) अंतर्गत 131 आदिवासी शेतकरी लाभार्थ्यांना शेतीकरीता बैलजोडी कृषी उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर येथुन दिनांक 27/12/2016, 27/02/2017, 12/03/2017, 19/03/2017 ला खरेदी करून पावत्या सादर केलेल्या आहेत. परंतु, संबंधित लाभार्थ्यांकडून लाभ घेत असल्याबाबत स्वाक्षरीसह “उपयोगीता प्रमाणपत्र” प्राप्त केल्याचे आढळले नाही.

2) सदर योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टिने विहीत प्रमाणांत तपासणी करणे आवश्यक आहे. कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच जिल्हा विकास अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी 10 टक्के तपासणी करणे आवश्यक असतांना तपासणी केल्याचे अहवाल आढळले नाही.

3) अनुदान वितरण आदेशानुसार सदर अनुदानाचा लाभ सन 2016-2017 चे शासन निर्णयातील अटी व शर्तीचे अधीन राहून लाभ देण्यांत यावा. तसेच दिलेले अनूदान 100 टक्के खर्च करावा, असे असतांना टि.एस.पी.अंतर्गत 6 लाभार्थ्यांना लाभ देण्यांत आलेला नाही. त्यामुळे ते 6 गरजु लाभार्थी लाभापासून वंचीत राहिले

4) शासन निर्णय दिनांक 21/01/2017 नुसार लाभार्थ्याला अनुदानाची रक्कम त्याचे बँक खाते आधार क्रमाकांशी जोडून घेणे आवश्यक असून रक्क्म बँक खात्यांत आरटीजीएसद्वारे जमा करण्यांत आली आहे. परंतु, लाभार्थ्याला अनुदान प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षरीसह पोहोच पावती किंवा बँकेत अनुदानाची रक्कम जमा झाल्याबाबत बँक पास बुकची झेरॉक्स प्रत सादर करण्यात आलेले नाही.

5) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक आउयो-2415 /प्र.क्र.243/4-अ, दिनांक 16/07/2016 मधील परिशिष्ट -2 चे परिच्छेद क्रमांक-4 नुसार बैलजोडीची खरेदी स्थानिक जनावरांच्या बाजारात लाभार्थ्यांचे संमतीनुसार पशुवैद्यकीय अधिकारी व कृषी अधिकारी, विशेष घटक योजनायांच्या उपस्थितीत करावी व लाभार्थीचा बैलजोडी समवेत पोस्टकार्ड साईजचा फोटो काढावा, असे असतांना श्री.बळीराम कोडाप, श्री.राजीराम ढोक, श्री.संपत नारनवरे व श्री.गुणवंत दडमल या लाभार्थीचे बैलजोडीसोबत

कृषी अधिकारी, विशेष घटक योजना (पंचायत समिती) यांचा दिनांक 27/12/2016 ला बैलजोडीसोबत फोटो आढळला नाही.

**4.447 50 टक्के अनुदानावर जिल्हा परिषदकडून प्राप्त लोखंडी बैलगाडी वाटपातील अनियमितता**

**पंचायत समिती आरमोरी, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** 50 टक्के अनुदानावर जिल्हा परिषदेकडून प्राप्त लोखंडी बैलगाडी वाटपाकरिता रक्कम रूपये 8,48,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी हिस्सा भरणा केल्याचे दिसुन आले नाही. लाभार्थी यादी मंजुर नसतांना लाभार्थ्यांकडुन लाभार्थी हिस्सा प्राप्त नसतांना वरीलप्रमाणे दिनांक 18/10/2016 ला लोखंडी बैलगाडीचा आदेश नियमबाह्यपणे देण्यात आल्याचे आढळुन येत आहे. त्यामुळे नियोजन न करता अनावश्यक खरेदी झाली आहे.

2) शासन निर्णयाप्रमाणे टक्केवारी लाभाच्या योजनेत प्रथम लाभार्थ्याकडुन लाभार्थी हिस्सा वसुल करुन नंतर मागणी नोंदवावयाची आहे. परंतु, तसे झाल्याचे आढळुन आले नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेड.पी.ए.2000/ प्र.क्र.41/33 दिनांक 10/01/2001 प्रमाणे नमुद केल्यानुसार योजनेचे लाभार्थी निवडीपासुन ते लाभ देण्यापर्यंतचे वेळापत्रक पाळण्यात आले नाही. ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक1089/प्र.क्र./55364, दिनांक 05/10/1989 नुसार मास्टर नोंदवही ठेवुन लाभार्थ्यास दुबार लाभ दिला नसल्याची खात्री पटवावी

4) कृषी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक विप्र.6/वि.घ.योजना/अंतरीम/मासु/2012-13/ 380/2012, दिनांक 02/05/2012 अंन्वये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन झाले नाही. त्यामध्ये लाभार्थाचे अर्ज प्रस्ताव लेखापरिक्षणास सादर करण्यत आले नाही. त्यामुळे उपरोक्त पत्राप्रमाणे मार्गदर्शक सुचना तपासता आले नाही.

5) वरीलप्रमाणे साहित्य साठा दिनांक 23/12/2016 ते 24/03/2017 मध्ये वाटप झाले आहे. तसेच दिनांक 23/12/2016 ला 28 नग प्राप्त झाले असून त्यापैकी 22 लाभार्थ्यांना 22 नग वाटप केले असुन शिल्लक 6 नगची नोंद साठा नोंदवहीमध्ये दिसुन आले नाही व लाभार्थी हिस्सा भरणा केल्याचे दिसुन आले नाही. म्हणजेच लाभार्थी हिस्सा प्राप्त होणे आधीच लोखंडी बैलगाडी वाटप हे नियमबाह्यपणे झाल्याचे आढळून आले आहे. उपयोगिता प्रमाणपत्र घेऊन अनुपालन दर्शवावे.

**4.448 100 टक्के अनुदानावर विशेष घटक योजनाअंतर्गत लाभार्थ्यांना बैलजोडी खरेदी व वाटपातील अनियमितता**

**पंचायत समिती आरमोरी, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 30) -** पंचायत समिती, आरमोरी, कृषी विभाग यांनी सन 2014-2015 या वित्तीय वर्षात अनुसुचित जाती उपयोजना अंतर्गत (विशेष घटक योजना) अनुसुचित जाती नवबौध्द शेतकयांना शेतीसाठी अर्थसहाय देण्याच्या योजनेनुसार बैलजौडी खरेदी करुन वाटप करणेवर रक्कम रूपये 360000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र सन कृषी पशूसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्रमांक विशेष घटक योजना/1514/प्र.क्र.97/4 अे दिनांक 07 जुलै 2014 परिशिष्ट दोन क्र. 4 नुसार बैलजोडी घटकाचा लाभ घेतल्यानंतर त्यांच लाभार्थ्यास पुढील पाच वर्षात बैलजोडी घटकाचा लाभ घेता येणार नाही असे नमूद केले आहे त्याकरीता लाभार्थ्यांना देण्यात येणा-या बाबवार अर्थसहायाची योजनानिहाय, बाबनिहाय व लाभार्थीनिहाय नोंद करण्याकरीता पंचायत समितीस्तरावर रजिष्टर ठेवण्यात यावे. पंचायत समिती स्तरावरील नोंदवहया व अभिलेख जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी साक्षांकित करणे आवश्यक राहील. तसेच कृषी विकास अधिकारी यांनीही पंचायत समिती स्तरावरील नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक राहील, असे नमूद केले असतांना त्यानुसार कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

2) उपरोक्त नमुद शासन निर्णयातील परिच्छेद 7 नुसार लाभ देण्यात आलेल्या लाभार्थाचा फलनिष्पत्ती अहवाल प्राप्त करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही.

**4.449 अनुसुचित जाती SCP आदिवासी उपयोजना TSP आदिवासी क्षेत्राबाहेरील लाभार्थींना बैलजोडीकरीता अर्थसहाय्यमधील अनियमितता.**

**पंचायत समिती चामोर्शी, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** अनुसुचित जाती SCP आदिवासी उपयोजना TSP आदिवासी क्षेत्राबाहेरील लाभार्थींना बैलजोडीकरीता अर्थसहाय्य करणेबाबत रक्कम रूपये 33,60,000/ खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक विप्र-7/विघोयो/अंतरिम मा.सु./15-16/210/15, दिनांक 11/04/2015 मार्गदर्शन सूचना 3 नुसार सदर योजनेस तालुका स्तरावर सहाय्यक विस्तार अधिकारी, पंचायत समिती यांनी विविध माध्यमाद्वारे व्यापक प्रमाणात प्रसिद्धी करावी. प्राप्त अर्जांची/प्रस्तावांची योजनेच्या निकषाद्वारे काटेकोर छाननी करावी. पात्र लाभार्थींची जिल्हास्तरीय समितीकडे शिफारस पाठवावी. जिल्हास्तरीय समितीने छाननी अंती प्राप्त अर्जदारांची यादी परिपूर्ण अर्ज प्राप्त होईल, त्या दिनांकास तो क्रमवारीत नोंदवावा. “प्रथम प्राप्त प्रथम प्राधान्य” या तत्वानुसार लाभार्थी निवडीची प्रक्रिया करावी. 4.7 नुसार लाभार्थींना योजनेचा लाभ वेळेवर देण्याच्या दृष्टिने माहे जून 2015 अखेर लाभार्थी निवडीची प्रथम प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य आहे. तसेच जूलै ते ऑक्टोबर या कालावधीत व्हिीर व्यतिरिक्त अन्य बाबींचा लाभार्थींना पूर्ण लाभ देणे आवश्यक राहील, अशा सूचना आहे. परंतू, लाभार्थी निवड व लाभार्थींना लाभ देणेबाबतचे वेळापत्रकाचे पालन केल्याचे आढळून आले नाही.

2) मार्गदर्शक सूचना 6.6 नुसार मंजूर निधीपैकी 3 टक्के निधी अनुसूचीत जातीतील अपंग शेतकऱ्यांसाठी राखून योजना राबविल्याचे आढळून आले नाही. तसेच 6.8 नुसार लाभार्थ्यांना वितरण करावयाच्या घटकाचे वितरण लोकप्रतिनिधींच्या हस्ते जाहीर कार्यक्रमाद्वारे केल्याचे आढळून आले नाही.

3) मार्गदर्शक सूचना 7 नुसार लाभार्थ्यांना अनुज्ञेय बैलजोडी / रेडे जोडी या बाबीसाठी अनुदानाची रक्कम काटेकोर पडताळणीनंतर लाभार्थ्यांचे बँक खात्यात जमा करणे अपेक्षीत आहे. अनुदानाची रक्कम बँकेत जमा केल्याचे आढळून आले. परंतू, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 20 व 21 नुसार पुरवठादाराची पोच पावत्या आढळून आल्या नाहीत.

4) बैलजोडी खरेदीची नोंद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 93 नुसार Live Stock Register Form No. 35 मध्ये जनावराचे वर्णन तपशील सह घेणे आवश्यक आहे. परंतू, त्याचे पालन केलेले नाही.

5) मार्गदर्शक सूचना 6.2 व 6.3 नुसार योजनेचे मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणेमार्फत करून लाभ दिलेल्या घटकाची व खर्चाची माहिती संकेत स्थळावर अपलोड करून योजनेच्या फलश्रुतीबाबत अहवाल व लोकप्रतिनिधीचे अभिप्राय घेऊन योजनेची यशोगाथा अभिप्रायासह कृषी आयुक्तालयास पाठविल्याचे आढळून आले नाही.

**4.450 अनूसूचित जाती उपयोजना अंतर्गत 100 टक्के अनूदानावर बैल जोडी खरेदिबाबत.**

**पंचायत समिती देसाईगंज वडसा, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समीती, देसाईगंज (वडसा) येथील सन 2016-2017 चे लेखापरीक्षण वेळी कृषी विभाग यांनी अनूसूचित जाती उपयोजना अंतर्गत 100 टक्के अनूदानावर एकूण 10 लाभार्थ्यांना कृषी उत्पन्न बाजार समिती, ब्रम्हपूरी येथून बैलजोडी खरेदी करून रक्कम रूपये 3,00,000/- वाटप केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-2017 चे मार्गदर्शक सुचना पत्र क्रमांक 451, दिनांक 25/08/2016 नुसार ज्या लाभर्थ्यांकडे सद्यस्थितीत स्वत:ची बैलजोडी आहे, अशा लाभार्थ्यांना बैलजोडीचा लाभ अनुज्ञेय नाही. परंतु, संबंधीत शेतकऱ्यांकडे सध्या लाभ देण्याअगोदर बैलजोडी नसल्याचे पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असतांना ते प्रमाणपत्र जोडण्यांत आलेले नाही.

2) सदर वित्तीय वर्षात निवड केलेल्या विशेष घटक योजनेतील अनुसूचीत जाती उपयोजना अंतर्गत 10 लाभार्थ्यांना बैलजोडी कृषी उत्पन्न बाजार समिती, ब्रम्हपूरी येथुन खरेदी करून वाटप केले आहे व त्याची नोंद साठा-

माल पुस्तकांत घेण्यांत आलेली आहे. परंतु, संबंधित लाभार्थ्यांकडून लाभ घेत असल्याबाबत स्वाक्षरीसह " उपयोगीता प्रमाणपत्र " प्राप्त केल्याचे अभिलेख्यांत आढळले नाही.

3) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या मार्गदर्शक पत्र क्रमांक वि.प्र.7/ विशेष घटक योजना-451, दिनांक 25/08/2016 मधील सुचानाप्रमाणे मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु, सदर योजनेअंतर्गत लाभ देण्यांत आलेल्या लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवण्यांत आलेली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला एकापेक्षा जास्त वेळा (दुबार लाभ) न दिल्याची खात्री करता आले नाही.

4) सदर योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टिने विहीत प्रमाणांत तपासणी करणे आवश्यक आहे.

कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच जिल्हा कृषी विकास अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी 10 टक्के तपासणी करणे आवश्यक असतांना तपासणी केल्याचे अहवाल अभिलेख्यांत आढळले नाही.

**4.451 गोबर गॅस संयंत्र अनुदान वाटपातील त्रुटीबाबत**

**पंचायत समिती कोरची, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर योजनेवर रक्कम रूपये 76,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) करारनामा केलेला नाही.

2) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक बिजीएस 2014/प्र.क्र. 129/प.रा. 6, दिनांक 07/02/2015 परि.क्र. 8 नुसार लाभार्थ्याने बांधलेले बायोगॅस संयत्र पूर्णपणे कार्यान्वित झाल्याखेरीज व पूर्णत्वाचा दाखला(गट विकास अधिकारी किंवा कृषी विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीसह) प्राप्त झाल्याशिवाय लाभार्थींना अनुदानाची रक्कम देण्यात येऊ नये, अशा सूचना आहे. परंतू, पूर्णत्वाचे दाखले प्राप्त केल्याचे आढळून आले नाही.

3) गोबर गॅस संडास जोडणी करीता रक्कम रुपये 1,200/- अनुदान अनुज्ञेय आहे 5 लाभार्थींना रक्कम रुपये 6,000/- अदा केलेली आहे. परंतू, बायोगॅस टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट ग्रुप परिपत्रक क्रमांक 5-5/2014 BE (NB MMP) Dt. 30/06/2014 परि. 8 नुसार संडास जोडणी योग्य झाल्याबाबत तपासणी केल्याचे प्रमाणपत्र आढळून आले नाही.

4) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक बिजीएस 2014/प्र.क्र. 129/पं.रा.-6, दिनांक 07/02/2015 परि.क्र.12 नुसार उभारण्यात आलेली बायोगॅस संयंत्रे ही योग्य प्रकारे वापरली जावीत, यासाठी संबंधीत लाभार्थींना प्रशिक्षण, बांधकाम व देखभाल प्रशिक्षण कर्मचारी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. या प्रशिक्षण वर्गाचे स्वत: जिल्हा परिषदांनी किंवा मान्यता प्राप्त बायोगॅस विस्तार केंद्रामार्फत आयोजन करावे. आयोजित केलेल्या प्रशिक्षणाचा सविस्तर अहवाल शासनास सादर करावा, अशा सूचना आहेत. परंतू, प्रशिक्षण घेतल्याचे आढळून आले नाही.

5) शासन निर्णय दिनांक 07/02/2015 परि.क्र. 18 लाभार्थ्यांची यादी संपूर्ण माहितीसह वेबसाईटवर अपलोड करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ही माहिती लेखा तपासणीत उपलब्ध करुन घ्यावी, अशी सूचना आहे. तसेच बायोगॅस संयंत्राचा अनुक्रमांक, जिल्हा, तालुका अंमलबजावणी यंत्रणा इत्यादी माहिती असलेली धातूची पट्टी प्रत्यक्ष बायोगॅस संयंत्रावर बसविण्यात यावी. पूर्ण झालेल्या संयंत्रासह घेतलेले लाभार्थीचे छायाचित्र केंद्रीय अर्थसहाय्याचे सवितरण नोंदीसह ठेवण्यात यावे, असे नमूद आहे. परंतू, तसे छायाचित्र काढल्याचे आढळून आले नाही.

**4.452 अनुसुचित जाती SCP आदिवासी उपयोजना TSP लाभार्थींना बैलजोडी करीता अर्थसहाय्य मधील अनियमितता.**

**पंचायत समिती कोरची, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक विप्र-7/ विघोयो /अंतरिम मा.सु./15-16/210/15, दिनांक 11/04/2015 मार्गदर्शन सूचना 3 नुसार सदर योजनेस तालुका स्तरावर

सहाय्यक विस्तार अधिकारी पंचायत समिती यांनी विविध माध्यमाद्वारे व्यापक प्रमाणात प्रसिद्धी करावी. प्राप्त अर्जांची / प्रस्तावांची योजनेच्या निकषाद्वारे काटेकोर छाननी करावी, पात्र लाभार्थींची जिल्हास्तरीय समितीकडे शिफारस पाठवावी. जिल्हास्तरीय समितीने छाननी अंती प्राप्त अर्जदारांची यादी परिपूर्ण अर्ज प्राप्त होईल, त्या दिनांकास तो क्रमवारीत नोंदवावा. "प्रथमप्राप्त प्रथम प्राधान्य" या तत्वानुसार लाभार्थी निवडीची प्रक्रिया करावी. 4.7 नुसार लाभार्थींना योजनेचा लाभ वेळेवर देण्याच्या दृष्टिने माहे जून अखेर लाभार्थी निवडीची प्रथम प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य आहे. तसेच जूलै ते ऑक्टोबर या कालावधीत विहिर व्यातिरिक्त अन्य बाबींचा लाभार्थींना पूर्ण लाभ देणे आवश्यक राहील, अशा सूचना आहे. परंतू, लाभार्थी निवड व लाभार्थींना लाभ देणेबाबतचे वेळापत्रकाचे पालन केल्याचे आढळून आले नाही.

2) मार्गदर्शक सूचना क्रमांक 6.6 नुसार मंजूर निधीपैकी 3 टक्के निधी अनुसूचीत जातीतील अपंग शेतकऱ्यांसाठी राखून योजना राबविल्याचे आढळून आले नाही. तसेच 6.8 नुसार लाभार्थ्यांना वितरण करावयाच्या घटकाचे वितरण लोकप्रतिनिधींच्या हस्ते जाहीर कार्यक्रमाद्वारे केल्याचे आढळून आले नाही.

3) मार्गदर्शक सूचना 7 नुसार लाभार्थ्यांना अनुज्ञेय बैलजोडी / रेडे जोडी या बाबीसाठी अनुदानाची रक्कम काटेकोर पडताळणीनंतर लाभार्थ्यांचे बँक खात्यात जमा करणे अपेक्षीत आहे. अनुदानाची रक्कम बँकेत जमा केल्याचे आढळून आले. परंतू, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 20 व 21 नुसार पुरवठादाराची पोच पावत्या आढळून आल्या नाहीत.

4) बैलजोडी खरेदीची नोंद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 93 नुसार Live Stock Register Form No. 35 मध्ये जनावराचे वर्णन तपशील सह घेणे आवश्यक आहे. परंतू, त्याचे पालन केलेले नाही. SCP योजने अंतर्गत बैलजोडीची नोंद पेज क्रमांक 69 ते 74 वर, TSP योजने अंतर्गत बैलजोडीची नोंद पेज क्रमांक 12 ते 22 वर, साठा पुस्तक नमूना-33 मध्ये घेतल्याचे आढळून आले. परंतू, साठा पुस्तक पेज क्र. 14 ते 18 वर TSP अंतर्गत लाभार्थ्यांच्या सह्या नाही.

5) मार्गदर्शक सूचना 6.2 व 6.3 नुसार योजनेचे मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणे मार्फत करून लाभ दिलेल्या घटकाची व खर्चाची माहिती संकेत स्थळावर अपलोड करून योजनेच्या फलश्रुतीबाबत अहवाल व लोकप्रतिनिधीचे अभिप्राय घेऊन योजनेची यशोगाथा अभिप्रायासह कृषी आयुक्तालयास पाठविल्याचे आढळून आले नाही.

**4.453 प्रवासभत्ता देयकात किलोमीटर भत्ता प्रदान केलेबाबत.**

**पंचायत समिती बदनापूर, जिल्हा जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 25) -** कु.डि. ए. लहाने (कृषी विस्तार अधिकारी), पंचायत समिती, बदनापुर यांना प्रवासभत्ता प्रदान केले आहे. सदरील प्रवासभत्ता देयकाची तपासणी केली असता प्रवासभत्ता देयकामध्ये मोटार सायकलद्वारे प्रवासभत्ता किलोमीटर भत्ता रक्कम रुपये 41,399/- अदा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुंबई नागरी सेवा नियम 1959 मधील नियम 414(1) आणि (2) नुसार व महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, निर्णय दिनांक 03/03/2010 मधील नियमानुसार विभाग प्रमुखाची परवानगी न घेता मोटार सायकल वापर केलेला आहे. त्यामुळे झालेले प्रदान वाहनभत्ता/ प्रवासभत्ता नियमबाहय आहे.

2) याबाबत विभाग प्रमुखाची मान्यता का घेण्यात आलेली नाही, याबाबत खुलासा व्हावा. पुर्तता दर्शवावी.

3) अन्यथा संबंधितांकडुन नियमबाहय प्रदान केलेला किलोमीटर भत्ता वसुल करण्यात यावा. सदरील रक्कम शासन खाती भरुन अनुपालन दर्शवावे.

**4.454 रोखवही न लिहिता रक्कमा परस्पर खर्च करणेबाबत.**

**पंचायत समिती वडवणी, जिल्हा बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे पंचायत समिती, वडवणीचे लेखापरिक्षण करीत असतांना जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा काडीवडगाव चे रोखपुस्तक तपासले असता दिनांक 01/04/2016 ते 31/08/2016 पर्यंतचे रोखपुस्तक न लिहिता

संबंधित मुख्याध्यापकाने खाते क्रमांक 32000173838, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा वडवणीमधुन रकमा प्रदान केल्या आहेत.

सदर कालावधीत रक्कम रुपये 85,90,294/- अनुदान जमा झाले असुन रक्कम रुपये 74,57,755/- खर्च झाला आहे. तसेच सदर बँक विवरणपत्र तपासले असता मुख्याध्यापकाने रोखीने रक्कम रुपये 4,06,600/- उचल केल्याचे दिसुन येते.

अर्धसमासपत्र क्रमांक 70, दिनांक 17/10/2017 नुसार सदर रोखपुस्तक सादर करण्याबाबत सुचना दिली असता कार्यरत मुख्याध्यापकांनी सदर कलावधीतील अभिलेखे कार्यभार हस्तांतरणावेळी चार्जमध्ये मिळाले नसल्याबाबतचे नमुद केले आहे.

तरी दिनांक 01/04/2016 ते 31/08/2016 पर्यंत झालेल्या खर्चाबाबत रोखवही न लिहिणे गंभीर बाब असुन संबंधितावर योग्य ती कार्यवाही करुन रोखीने उचल रकमा संबंधितालाच मिळाल्याबाबतच्या पोच सादर कराव्यात.

**4.455 ओटीएसपी योजने अंतर्गत दुधाळ जनावरांचे गट वाटप योजनेतील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती जिंतूर, जिल्हा परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,70,122/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स व्यवसाय विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011 प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 प्रमाणे लाभार्थ्यांची निवड योग्य ते निकष लावुनच करणे आवश्यक आहे. नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 29 (4) नुसार रूपये 10,000/- यावरुन अधिक रक्कम दयावयाची असेल, तर ती रेखीत धनादेशाने घेणा-याच्या खाती जमा करणे आवश्यक आहे. परंतु, प्रस्तुत प्रकरणी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे नांवे धनादेश देऊन पशुधनविकास अधिकारी (विस्तार) यांनी विक्रेत्यास धनादेश वितरीत केलेले आहे. याबाबत खुलासा व्हावा.

3) उपरोक्त शासन निर्णायातील मार्गदर्शक सुचना क्रमांक 11 अन्वये शक्यतो क्लस्टर स्वरुपात आणि अस्तित्वातील दुध संकलन मार्गावरील गावांमध्ये राबविण्यात यावे तसेच उत्पादित दुध हे दुध संकलन केंद्रात दिल्याचे अभिलेखे संचिकत नाही.

4) उपरोक्त शासन निर्णयातील सुचना क्रमांक 12 प्रमाणे खरेदी समिती गठीत करणे आवश्यक आहे. संचिकेची तपासणी केली असता पशुधन विकास अधिकारी, विमा प्रतिनिधी व लाभार्थी यांचे स्वाक्षरी आहे. सहकारी दुध संस्था, बँक प्रतिनिधी यांच्या स्वाक्ष-या नाहीत.

5) उपरोक्त शासन निर्णयातील अट क्रमांक 13 प्रमाणे जनावरांची खरेदी राज्याबाहेरील नामांकित बाजारपेठे मधुनच करावी अश्या सुचना आहेत. परंतु, दुधाळ जनावरांची खरेदी स्थानिक बाजारपेठेमधून करण्यात आली आहे.

6) उपरोक्त मार्गदर्शक सुचना क्रमांक 20 प्रमाणे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी वाटप केलेल्या दुधाळ जनावरांची 20 टक्के प्रत्यक्ष पडताळणी करावी. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद व उपआयुक्त पशुसंवर्धन यांनी 10 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करुन तसा अहवाल वरीष्ठांना सादर करणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

7) उपरोक्त योजनेतील पहिल्या टप्प्याची खरेदी दिनांक 21/04/2017 रोजी केलेली आहे. उक्त शासन निर्णयानुसार प्रथम दुधाळ जनावर खरेदी केल्यानंतर 6 महिन्यानंतर दुसरे जनावर खरेदी करणे गरजेचे आहे. प्रथम लाभ माहे एप्रिल देण्यात आलेला आहे. दुसरा लाभ देण्यात आलेला नाही. दुसरा लाभ देऊन अनुपालन करावे.

8) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स व्यवसाय विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011 प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मधील अट क्रमांक 1 अन्वये योजना अमंलबजावणी अधिकारी यांनी या योजनेस सर्व प्रकाराच्या प्रसिध्दी माध्यामाव्दारे व्यापक प्रसिध्दी देऊन अर्ज मागविणे आवश्यक आहे. प्रसिध्दी देण्यात आली, याबाबत अभिलेखे संचिकेत नाही. उक्त शासन निर्णय अट क्रमांक

3 अन्वये प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची तारीखनिहाय नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवण्यात यावी. स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आली नाही.

**4.456 जिल्हा परिषद मतदारसंघ गटनिहाय फार्मस क्लब तयार करणेवरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 23) -** पंचायत समिती, तुळजापूर सन 2016-2017 या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद मतदारसंघ गटनिहाय फार्मर्स कल्ब तयार करणेसाठी रक्कम रुपये 4,50,000/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेचा उद्देश शेती व शेती संलग्न विषयाची माहिती व तत्रंज्ञान प्रचार / प्रसार करणे, शेतकऱ्यांचे शेती उत्पन्न वाढविण्यास मदत करणे आर्थिकदृष्टया सक्षम बनविणेकरीता एकूण 9 गटात प्रतिगट रुपये 50,000/- प्रमाणे प्रदान केलेले आहे. आदर्श फार्मर्स कल्ब, सावरगांव व विश्वमंगळ फार्मर्स, काटगांव यांनी प्रत्येकी रुपये 50,000/- प्रमाणे रक्कम रुपये 1,00,000/- लेखापरीक्षण दिनांकापर्यंत खर्च केलेला नाही व खर्चासंदर्भात कोणतेही कागदपत्रे पंचायत समितीस सादर केलेले नाहीत. संबंधित फामर्स क्लबकडून वसुल होणे आवश्यक आहे.

2) इतर 7 फामर्स क्लब यांनी खर्चासंदर्भात नेमका कोणत्या बाबीवर खर्च केला, ते नमुद केलेले नाहीत. सभासद नोंदणी अर्ज ठेवलेले नाहीत.

3) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक राकृवि-0815/प्र.क्र.69/राकृवियो कक्ष, दिनांक 04/06/2016 मधील तरतुदीनुसार प्रकल्पांतर्गत दृष्टीकोन व उद्देश प्रकल्पांतर्गत मदतीचे पॅकेज, कुटूंबनिहाय मदतीचे पॅकेज, शेतकऱ्यांच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांमध्ये विविधता आणण्यासाठी वेगवेगळ्या विभांगाच्या योजनांचे समन्वये प्रकल्प अंमतबजावणी व संनियंत्रण, प्रकल्पांची आखणी व घ्यावयाचे कार्यक्रम व वैयक्तिक लाभांच्या योजनांसहित सर्व कार्यक्रमांचे अंमलबजावणीचे वेळापत्रक तयार करुन खर्च करणे आवश्यक असतांना खर्च केला नाही.

**4.457 अनुसुचित जाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना / लोकांना बैलजोडी वाटप करणेबाबत.**

**पंचायत समिती भूम, जिल्हा उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती, भूमचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात पंचायत समिती येथील कृषी विभागामार्फत अनुसुचित जाती प्रवर्गामधील लाभार्थ्यांना / लोकांना बैलजोडी वाटप केली आहे. सदरबाबत 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 18,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी व पशुसंवर्धन विभाग, शासन निर्णय दिनांक 19/09/2000 नुसार निवड झालेल्या लाभार्थ्यास दिनांक 01/05/2001 नंतर एकूण अपत्याची संख्या 3 पेक्षा जास्त झाल्यास त्यांना लाभ देऊ नये, असे स्पष्ट निर्देश असतांना असे प्रमाणपत्र आढळले नाही.

2) संचालक (विस्तार प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मार्गदर्शक सुचना जा.क्र.- विप्र-7/विगयो/मासु/16-17/451/2016, दिनांक 25/08/2016 मधील सुचना क्रमांक 4.7 अन्वये मयत झालेल्या लाभार्थ्यांच्या बाबतीत त्यांचे कायदेशीर वारसाची निवड जिल्हास्तरीय समितीने करावयाची आहे. परंतु, अशी कार्यवाही केलेबाबतचे अभिलेखे संचिकेत पहावयास मिळाले नाहीत.

3) संचालक (विस्तार प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मार्गदर्शक सुचना जा.क्र.- विप्र-7/विगयो/मासु/16-17/451/2016, दिनांक 25/08/2016 मधील सुचना क्रमांक 05 अन्वये योजनेसाठी अंतीमत: निवड लाभार्थ्याची यादी ग्रामपंचायतीस पाठविण्यात यावी. परंतु, पंचायत समिती, भूम यांनी अशी कार्यवाही केली नाही.

4) संचालक (विस्तार प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मार्गदर्शक सुचना जा.क्रमांक- विप्र-7/विगयो/मासु/16-17/451/2016, दिनांक 25/08/2016 मधील सुचना क्रमांक 5.1 अन्वये स्थानिक वृत्तपत्र व दवंडीव्दारे प्रसिध्दी देण्यात यावी. परंतु, पंचायत समिती, भूम यांनी सदरील सुचनेप्रमाणे कार्यवाही केली नाही.

5) संचालक (विस्तार प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मार्गदर्शक सुचना जा.क्र.-विप्र-7/विगयो/मासु/16-17/451/2016, दिनांक 25/08/2016 मधील सुचना क्रमांक 6.1 अन्वये जिल्हा निवड समितीने निवड केलेल्या लाभार्थी शेतकऱ्याचे कृषी उत्पन्न वाढविण्यासाठी कृषी अधिकारी पंचायत समिती (विशेष घटक योजना) यांनी सर्वकष पीक आराखडा तयार करावा. परंतु, अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

6) संचालक (विस्तार प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मार्गदर्शक सुचना जा.क्र.-विप्र-7/विगयो/मासु/16-17/451/2016, दिनांक 25/08/2016 मधील सुचना क्रमांक 6.2 अन्वये 1982-83 पासुनची लाभार्थी यादी संकेतस्थळावर अपलोड करावी व फलश्रुती अहवाल आयुक्तालयास सादर करावा. परंतु, पंचायत समिती भूम यांनी सदरील सुचनेप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7) संचालक (विस्तार प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मार्गदर्शक सुचना जा.क्रमांक-विप्र-7/विगयो/मासु/16-17/451/2016, दिनांक 25/08/2016 मधील सुचना क्रमांक 6.3 अन्वये यशोगाथा रंगीत फोटोसह तयार कराव्यात व लोकप्रतिनिधींचे अभिप्राय घेण्यात यावेत. परंतु, पंचायत समिती, भूम यांनी सदरील नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2011/प्र.क्र.414/प.र.म.-4, दिनांक 06/07/2011 नुसार व संचालक (विस्तार प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना जा.क्र./विप्र-7/विगयो/मासु/16-17/451/2016, दिनांक 25/08/2016 मधील सुचना क्रमांक 6.6 अन्वये 3 टक्के शेतकरी विभागाने लाभार्थ्यांची निवड करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाली नाही.

9) उक्त कोष्ठकात नमुद केलेले प्रमाणक क्रमांक 12 चे अनुषंगाने लाभार्थ्यांना बैलजोडी वाटपाबाबतचे अभिलेखे तपासले असता त्यामध्ये श्री.महादेव एकनाथ गायकवाड, रा.अंजनसोंडा व श्री.लक्ष्मन जनार्दन कांबळे, रा.वालवड यांचे अनसुचिती जाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र लेखापरीक्षणात दिसून आले नाही. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना अनियमितरित्या लाभ दिल्याचे लेखापरीक्षणात दिसून येते. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांकडून रक्कम रुपये 60,000/- वसूल करुन शासन खाती भरणा करुन लेखापरीक्षणास पुर्तता दर्शवावी.

10) उक्त कोष्ठकात नमुद केलेले प्रमाणक क्रमांक 74 चे अनुषंगाने लाभार्थ्यांना बैलजोडी वाटपाबातचे अभिलेखे तपासले असता त्यामध्ये श्री.पंढरी निवृत्ती सोनवणे, रा.देवळाली, श्री.लहु आबा सोनवणे, रा.देवळाली व श्री.सुरेश मुरलीधर शिंदे रा.गणेगाव यांचे अनसुचिती जाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र लेखापरीक्षणात दिसून आले नाही. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना अनियमितरित्या लाभ दिल्याचे लेखापरीक्षणात दिसून येते. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांकडून रक्कम रुपये 12,000/- वसूल करुन शासन खाती भरणा करुन लेखापरीक्षणास पुर्तता दर्शवावी